# शब्द रुची

४७

जुलै २०२२ • मूल्य १० रुपये • ४० पृष्ठे



डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी.डी. पाटील यांचा विशेष सत्कार करताना भाषामंत्री सुभाष देसाई




## मंथन हीरकमहोत्सवी महाराष्ट्राचे...

- विज्ञान–तंत्रज्ञानातील हीरकमहोत्सवी महाराष्ट्र
- मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान
- मोहरा महाराष्ट्राचा





तीन खंडांचे प्रकाशन




प्रकाशनसमयी
अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर
हेमचंद्र प्रधान, विवेक पाटकर,
कुलपती डॉ. पी.डी. पाटील
भाषामंत्री सुभाष देसाई, राजीव खांडेकर
अ.पां. देशपांडे, अरुण शेवते,
डॉ. लतिका भानुशाली, धनश्री धारप

# पुस्तकप्रकाशनाची क्षणचित्रे



'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट' या पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, जयंत देव, डॉ. प्रमोद चौधरी, शतंनु दीक्षित आणि प्रवीण शिंदे



तीन खंडांच्या प्रकाशनसमयी स्मृतिचिन्हे देऊन अ.पां. देशपांडे, विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान, श्याम जोशी आणि
मुखपृष्ठकार सतीश भावसार यांचा सत्कार करताना डॉ. पी.डी. पाटील, सुभाष देसाई, राजीव खांडेकर, आशा आणि भगवान इंगळे



'कॅडेट नंबर ३४५०' – अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर,
मीना गोगटे, लेखक कॅप्टन सचिन गोगटे,
अविनाश धर्माधिकारी आणि पूर्णा धर्माधिकारी



'कॅन्सर म्हणजे... डोकं फिरलेल्या पेशी' – धनश्री धारप, डॉ. दुर्गा गाडगीळ, डॉ. गौरवी मिश्रा, गीताली पवार, डॉ. श्रीपाद बाणावळी, डॉ. अविनाश सुपे,
डॉ. सतीश नाईक, अपूर्वा वैद्य-मयेकर, सुदेश हिंगलासपूरकर आणि डॉ. लतिका भानुशाली

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४७

जुलै २०२२, वर्ष नववे
अंक तिसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

कार्यालयीन संपर्क
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**
**साहाय्य – अर्चित नागवेकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

एक सौंदर्यवादी अभिजात चित्रकार – रवी परांजपे / **६**
**दत्तात्रय पाडेकर**

हाडाचा फोकस्ड / ९
**सतीश तांबे**

हंगर – केन्युट हॅमसन / **१२**
**राजीव श्रीखंडे**

निसर्गऋणप्रकल्प-वास्तव आणि अपेक्षा / **१७**
**शरद काळे**

ऊर्जावान कलावंत / **२१**
**विजयराज बोधनकर**

सुनील कपाडिया / **२४**
**प्रकाश दुधळकर**

बायडनची अत्यवस्थ शासनसत्ता / **२७**
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ३१ ते ३४**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ३५**

## संपादकीय

**सोमवार,** २७ जून रोजी 'ग्रंथाली'ने सिद्ध केलेले तीन महत्त्वपूर्ण खंड प्रकाशित झाले. मराठी भाषा, साहित्य-संस्कृती आणि विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रांत महाराष्ट्राची गेल्या साठ वर्षांतील जडणघडण आणि कामगिरी यांचा मागोवा हे खंड घेतात. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि डॉ. अजय देशपांडे (मराठी राज्यातील मराठीचे वर्तमान), विवेक पाटकर आणि हेमचंद्र प्रधान (विज्ञान-तंत्रज्ञानातील हीरकमहोत्सवी महाराष्ट्र) आणि प्रा. रमेश अंधारे (मोहरा महाराष्ट्राचा) या पाच संपादकांच्या संकलन-संपादनाला याचे श्रेय आहे. महाराष्ट्राचे दोन वर्षांपूर्वी राज्यस्थापनेचे हीरकमहोत्सवी वर्ष होते. त्याचे औचित्य या ग्रंथांना आहे. याचा प्रकाशनवृत्तांत अंकात आहेच. प्रकाशनावेळी 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर यांनी व्यक्त केलेली भावना महत्त्वाची आहे. ते म्हणाले, 'हे खंड वाचल्यावर कोणीही महाराष्ट्राविषयी कुठे बोलणारा पंडित होऊ शकतो.' इतकी सर्वांगीण माहिती या खंडांत आहे. 'मोहरा महाराष्ट्राचा' खंड इतिहासाचा धांडोळा घेत गेल्या सहा दशकांकडे येतो, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हे खंड भविष्याकडे पथदर्शक ठरावेत. याला मोठेच संग्रहमूल्य आहे.

अविनाश कोल्हे हे बहुश्रुत व्यक्तिमत्त्व. नुकतेच त्यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानची अभ्यासवृत्ती जाहीर झाली. या मनस्वी व्यक्तित्वाबद्दल लिहिलं आहे सतीश तांबे यांनी.

रवी परांजपे यांचे चित्रकला व जाहिरात क्षेत्रातील नाव मोठे होतेच, त्यांची चित्रकारी जागतिक दर्जाची होती. त्यांनी कलेच्या बांधिलकीतून उत्तम चित्रकारांना वडिलांच्या नावाने 'कृ.रा. परांजपे गुणीजन पुरस्कार' देऊन गौरवले; तसेच, गुणी तरुण चित्रकारांना 'रवी परांजपे युवा पुरस्कार' देऊन सन्मानित केले. सर्वांशी सौहार्द राखणाऱ्या या अभिजात कलावंताबद्दल दत्ता पाडेकर यांनी आदरांजली वाहणारा लेख लिहिला आहे.

राजीव श्रीखंडे 'हंगर' या केन्युट हॅमसन यांच्या पुस्तकाचा परिचय करून देत आहेत. डॉ. शरद काळे यांचे कचराव्यवस्थापनाचे लेख नवा दृष्टिकोन देत आहेत. त्यातलाच 'वास्तव आणि अपेक्षा' हा लेख. विजयराज बोधनकर आणि प्रकाश दुधळकर यांचे 'चित्रगुज पश्चिमेचे' आणि 'छायाचित्रण' या विषयांतील लेखही आहेत. बायडनच्या कारकिर्दीवर डॉ. अनंत लाभसेटवार यांनी लिहिले आहे.

चांगदेव काळे यांची ग्रंथपाने 'ग्रंथाली'च्या ताज्या पुस्तकांचे नेमके मर्म सांगतात.

पुढील अंक अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनानिमित्त असेल.

**– अरुण जोशी**
कार्यकारी संपादक



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषामंत्री



**डी. वाय. पाटील**
कुलपती, डी.वाय. पाटील विद्यापीठ



**राजीव खांडेकर**
संपादक, एबीपी माझा



**अरुण शेवते**
संपादक, ऋतुरंग



**श्याम जोशी**
ग्रंथसखा, बदलापूर

# तीन महत्त्वपूर्ण खंडांचे प्रकाशन

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीची नोंद घेतली जावी या उद्देशाने ग्रंथालीने तीन खंडांचे प्रकाशन करण्याचे ठरवले. यामध्ये 'मराठी राज्यातले मराठी वर्तमान' या मराठी भाषाविषयक (संपादन : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी व डॉ. अजय देशपांडे), 'मोहरा महाराष्ट्राचा' या साहित्यिक-सांस्कृतिक वाटचालीविषयी (संपादन : रमेश अंधारे) आणि 'विज्ञान-तंत्रज्ञानात हीरकमहोत्सवी महाराष्ट्र' या विज्ञानविषयक (संपादन : विवेक पाटकर आणि हेमचंद्र प्रधान) या तीन खंडांचे प्रकाशन २७ जून २०२२ रोजी मंत्रालयाच्या परिषद सभागृहामध्ये दुपारी १ वाजता महाराष्ट्राचे उद्योग, खनिकर्म, मराठी भाषामंत्री सुभाष देसाई, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी.डी. पाटील, एबीपी माझा वृत्तवाहिनीचे संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते व ज्येष्ठ साहित्यिक व ऋतुरंग मासिकाचे संपादक अरुण शेवते यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

भाषामंत्री सुभाष देसाई यावेळी बोलताना म्हणाले, या तीन खंडांमुळे मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. मराठीच्या प्रगतीमध्ये अडथळे आणणारे जसे आहेत तसे त्यासाठी मदत करणारेही आहेत, त्यामुळे ज्ञानाधिष्ठित कृती करत राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

आरंभी सुदेश हिंगलासपूरकर यांनी या ३ खंडांच्या निर्मितीमागची भूमिका मांडली आणि ग्रंथालीच्या वाटचालीविषयी माहिती सांगितली. डॉ. पी.डी. पाटील यांनी उत्स्फूर्तपणे 'मोहरा महाराष्ट्राचा' या खंडाच्या पाचशे प्रती घेण्याचे मान्य केल्याने अन्य दोन खंड करण्याचा हुरूप आला, असे सुदेश हिंगलासपूरकर म्हणाले. या संदर्भात बोलताना डॉ. पी.डी. पाटील यांनी या खंडांचे कौतुक करत, यापुढेही अशा उत्तम कामाला नक्की सहकार्य राहील असे, आश्वासन दिले. यावेळी त्यांचा सुभाष देसाई यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्याला उत्तर देताना ते बोलत होते. राजीव खांडेकर यांनी मराठीतील नव्या उत्तम लेखकांचे कौतुक करत, समाज व माध्यमांकडून त्याची आवश्यक तशी दखल घेतली जात नाही ही खंत व्यक्त केली. सध्या महाराष्ट्रातील लोकांमध्ये मराठीविषयी अभिमान जास्त आणि प्रेम कमी अशी स्थिती असल्यामुळे पूर्वीच्या तुलनेत विविध क्षेत्रांमध्ये देशपातळीवर ठसा उमटवणारी मोजकीच मंडळी दिसतात, असे मत त्यांनी मांडले. ग्रंथालीद्वारा प्रकाशित हे तीन खंड वाचल्यावर कुणीही महाराष्ट्राविषयी पंडित म्हणून जगात वावरू शकेल असे उद्गार त्यांनी काढले.


अरुण शेवते यांनी आपल्या मनोगतामध्ये या पुस्तकांचे आणि त्यासाठी ग्रंथालीने घेतलेल्या मेहनतीचे कौतुक केले.

या कार्यक्रमात उपस्थित संपादकांचा सत्कार करण्यात आला. ग्रंथसखा वाचनालयाचे श्याम जोशी यांनी कार्यक्रमाचे समयोचित सूत्रसंचालन केले.

**– प्रतिनिधी**




**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ५०० रु.**





**मूल्य १५०० रु.**
**सवलतीत १००० रु.**




**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ५०० रु.**

**तिन्ही खंड एकत्रित १५०० रुपयांत! टपालखर्च १०० रु. एका खंडासाठी टपालखर्च ५० रुपये.**



# एक सौंदर्यवादी अभिजात चित्रकार रवी परांजपे


दत्तात्रय पाडेकर

**रवी** परांजपे - एक थोर उत्तुंग व्यक्तिमत्त्व. एक विचारवंत, अभिजात कलावंत. चित्रकलेच्या क्षेत्रात त्यांनी त्यांच्या कामाने प्रचंड दबदबा निर्माण केला होता. त्यांच्या जाण्याने कलाक्षेत्रातील एका पर्वाचा अंत झाला असे मला मनापासून वाटते.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मी जे.जे.मध्ये शेवटच्या वर्षात शिकत असताना रवी परांजपेसर आम्हाला 'इलस्ट्रेशन' हा विषय शिकवण्यासाठी येत असत. ते आम्हाला मॉडेलवरून पेन्सिलने लाइफ ड्रॉईंग आणि त्या ड्रॉईंगवरून इलस्ट्रेशन कसे करायचे ते शिकवत असत. ते करताना त्यांचे ब्रशवरचे प्रभुत्व पाहून आम्ही थक्क होत असू. सोबत त्यांनी केलेली इलस्ट्रेशन ते आम्हाला दाखवायला घेऊन येत असत. त्यात एका फायनल इलस्ट्रेशनसाठी दोन-तीन स्केचेस केलेली असत. ती रफ स्केचेस ही फायनल इलस्ट्रेशनसारखीच असतात. त्याला ते रफ स्केचेस का म्हणत याचेच आम्हाला आश्चर्य वाटत असे.

त्यांची इलस्ट्रेशनही वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांनी आपली स्वत:ची अशी एक प्रभावशाली वेगळीच शैली निर्माण केली. त्या शैलीचा प्रभाव अनेक चित्रकारांवर पडला. ती शैली एवढी प्रभावशाली होती की अनेक एजन्सीमधून 'आम्हाला परांजपे स्टाइलचे इलस्ट्रेशन हवे' अशी मागणी असायची. जाहिरातक्षेत्रात सुमारे चार दशके एक प्रतिभावान इलस्ट्रेटर म्हणून त्यांनी आपले वर्चस्व गाजवले. त्यांची इलस्ट्रेशन हा जाहिरातीचा आत्मा असायची, कारण ती कलात्मक आणि सौंदर्यपूर्ण असत. चित्रकार दीनानाथ दलाल यांनी जनसामान्यांमध्ये रसिकता निर्माण केली तशी रवी परांजपे यांच्या चित्रांनीही सार्वत्रिक अभिरुची निर्माण केली.

रवी परांजपे यांच्या कामाचा कलात्मक दर्जा अनेक उत्तमोत्तम अमेरिकन इलस्ट्रेटरांप्रमाणेच अप्रतिम होता. बॉब पेक, मार्क इंग्लिश, रॉबर्ट हॅन्डल, बार्ट फॉर्ब्स, बर्नी फूक्स, एन.सी. वायथ, नॉर्मन रॉकवेल यांच्यासारखे अनेक जागतिक कीर्तीचे 'इलस्ट्रेटर-पेन्टर' होऊन गेले. रवी परांजपे हे मला त्या परंपरेतील जागतिक दर्जाचे चित्रकार वाटतात. त्यांचे काम जगप्रसिद्ध चित्रकार आल्फांसो मूचा



रवी परांजपे

आणि गुस्ताव क्लिम्ट यांच्या तोडीचे वाटते. त्यांनी केलेल्या इलस्ट्रेशनला 'कॅग'चा उत्कृष्ट इलस्ट्रेशनचा पुरस्कार मिळाला होता. तसेच 'कॅग' संस्थेतर्फे त्यांच्या जाहिरात क्षेत्रातील इलस्ट्रेशन या कलात्मक योगदानाबद्दल 'हॉल ऑफ फेम' हा जीवनगौरव पुरस्कारदेखील मिळाला होता.

त्यांनी जाहिरातक्षेत्राप्रमाणेच अभिजात चित्रकलेच्या क्षेत्रातही आपला वेगळा असा कलात्मक ठसा उमटवला. 'सुंदर ते वेचावे, सुंदर करोनी मांडावे, स्व-इतरांसाठी' हे त्यांचे ब्रीद होते. त्याप्रमाणेच त्यांची चित्रेही सौंदर्यपूर्ण आहेत. त्यांची अभिजात चित्रेही परांजपेशैलीची तर आहेतच, शिवाय त्यात आपल्याला भारतीयत्वही जाणवते. भारतीय मिनीएचर शैलीचा अभ्यास करून त्यांनी स्वत:ची अशी अलंकारिक शैली निर्माण केली. सपाट, रंगलेपन, लयदार रेषा, अनेक आकारांची गुंफण, कंपोजिशन, ॲक्रेलिक किंवा तैलरंगासारखे माध्यम वापरून त्यांनी मोठ्या आकाराची चित्रे




साकारली. अनेक प्रयोग त्यांनी केले. त्यामुळे त्यांच्या चित्रात विविधता जाणवते.

चित्रविषय कोणताही असो, त्यातील सौंदर्य हा त्या चित्राचा महत्त्वाचा गाभा. अचूक, उत्तम ड्रॉईंग हा चित्रकलेचा मूळ पाया मजबूत असल्यामुळे, त्यांच्या चित्रामध्ये कोणतेही घटक असो, त्यात त्यांचा अभ्यास जाणवतो. चित्रातील बारकावे, लय, डौल हे अचूक टिपलेले दिसतात.

प्रत्येक गोष्टीतील सौंदर्य शोधून, ते चित्ररूपात साकारण्याची क्षमता ही त्यांना मिळालेली निसर्गदत्त देणगी होती असे मला वाटते. त्यांच्या चित्रातील रंगसंगती आणि चित्ररचनाही फार प्रभावी गोष्ट असे. सुंदर रंगसंगतीमुळे त्यांची चित्रे नेहमीच आनंददायी, फ्रेश वाटतात. त्यांच्या चित्रांत अनेक रंगांची उधळण असते, सुसंगतता असते व रंगांची 'मेलडी'ही असते. अनेक ठिकाणी ब्राईट आणि फ्रेश रंग वापरून चित्राचा तोल सांभाळणे ही फार अवघड गोष्ट आहे, परांजपे ती लीलया साधत.


रवी परांजपे यांचे सर्वच माध्यमांवर प्रभुत्व होते. ग्राफाईट पेन्सिल, रंगीत पेन्सिल, पेस्टल रंग, पारदर्शक व अपारदर्शक जलरंग, ॲक्रेलिक, तैलरंग, माध्यम कोणतेही असो– त्यातून ते त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत सुंदर कलाकृती निर्माण करत. ही सर्व माध्यमे त्यांनी चाकोरीबाह्य, नावीन्यपूर्णतेने हाताळली आहेत. त्यांच्या निसर्गचित्राला आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांच्या कलाक्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाने 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित केले. तसेच, बॉम्बे आर्ट सोसायटीचा 'रुपधर' हा जीवनगौरव पुरस्कारही त्यांना लाभला होता.

रवी परांजपे यांचे कलेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे 'आर्किटेक्चरल रेंडरिंग' हा वेगळा चित्रप्रकार त्यांनी निर्माण केला. त्या आधी कोणी असे कलात्मक, दर्जेदार 'आर्किटेक्चरल रेंडरिंग' केले नव्हते. ते फक्त प्लान आणि एलिवेशनवरून संपूर्ण गृहसंकुलाचे, मोठ्या आकाराचे कलात्मक आणि सुंदर चित्र पोस्टर कलरमध्ये साकारत असत. परस्पेक्टिव ड्रॉईंग करण्याची सोपी पद्धत त्यांनी शोधून काढली होती, तीही छायाप्रकाशासहित. त्यांची ही गृहसंकुलाची चित्रे प्रत्यक्ष गृहसंकुलापेक्षा सुंदर व कलात्मक असत. ती चित्र म्हणजे जणू काही अभिजात कलाकृतीच. त्यांच्या या कामाचा प्रचंड आवाका आणि छायाप्रकाशासहित बारीकसारीक तपशील पाहून अचंबित व्हायला होते.

त्यांच्या कलेसंदर्भात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांचे कोणतेही रफ स्केच, इलस्ट्रेशन किंवा अभिजात चित्र असो– ते उपजत सौंदर्य लेऊनच येत असे. त्यांनी केलेले सर्व कलात्मक काम सौंदर्यवादी, अलंकारिक, नावीन्यपूर्ण, चाकोरीबाह्य, शैलीदार आणि आश्चर्यकारक आहे.

रवी परांजपे यांनी चित्रकलेसंबंधी स्फुटलेखन केले आहे. कलेचे विद्यार्थी, कलाशिक्षक आणि कलारसिकांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतील अशी चित्रमय पुस्तके लिहिली. कृष्ण–धवल आणि रंगीत इलस्ट्रेशन, ड्रॉईंग, अभिजात चित्रकला या विषयांवर पुस्तके लिहिली. 'शिखरे रंगरेषांची' हे त्यांचे पुस्तक जगातील २५ थोर चित्रकार आणि त्यांच्या कलाकृती–चित्रकाराच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केलेले आहे.

त्यांनी चित्रकलेवर पुस्तके लिहिली तशी वैचारिक आणि चिंतनात्मक पुस्तकेही लिहिली. 'तांडव हरवताना', 'नीलधवल ध्वजाखाली' तसेच 'अभिजाततेच्या दृष्टिकोनातून भारत– काल, आज आणि उद्या' ही पुस्तके लिहिली. त्यातील 'नीलधवल



ध्वजाखाली' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला. त्यांचे 'ब्रश माइलेज' हे आत्मचरित्र अप्रतिम आहे. या पुस्तकाला 'भैरुरतन दमाणी पुरस्कार' लाभला आहे.

त्यांनी कलेच्या बांधिलकीतून उत्तम चित्रकारांना वडिलांच्या नावाने 'कृ.रा. परांजपे गुणीजन पुरस्कार' देऊन गौरवले; तसेच, गुणी तरुण चित्रकारांना 'रवी परांजपे युवा पुरस्कार' देऊन सन्मानित केले. गुणी चित्रकारांना आणि तरुण चित्रकारांना एखाद्या चित्रकाराने सन्मानित करणे असे हे एकमेव उदाहरण असावे.

चित्रकारांसाठी 'रवी परांजपे फाउंडेशन'ची स्थापना करून कलाप्रदर्शनासाठी कलादालन, कार्यशाळा तसेच तरुण कलाकारांना मार्गदर्शन मिळेल अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली.

रवी परांजपे कलाक्षेत्रातल्या अनिष्ट रूढी, दांभिकपणा यांच्यावर वेळोवेळी लेखनातून जाहीरपणे सडेतोड मतप्रदर्शन करत असत. त्यांच्या विचारांत, बोलण्यात, लिहिण्यात, वागण्यात स्पष्टपणा होता, कोठेही संदिग्धता नव्हती. अतिशयोक्ती, आत्स्तुती, अतिरंजिता हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांची सर्व गोष्टींची मांडणी मुद्देसूद, सकारात्मक आणि सौंदर्यपूर्ण असायची. त्यांची विचारसरणी त्यांच्या कलेप्रमाणेच उच्च दर्जाची होती. त्यांच्याकडून वेळेचे नियोजन शिकण्यासारखे आहे. त्यांच्याकडे कोणताही जाहीर कार्यक्रम, समारंभ असो; कार्यक्रम वेळेतच सुरू होत असे आणि वेळेतच संपत असे. इतरांच्या वेळेचा त्यांनी अशा प्रकारे केलेला सन्मान क्वचितच पाहायला मिळतो. अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये त्यांच्या पत्नी स्मितताई यांचा मोलाचा वाटा असायचा. परांजपेसरांना त्यांच्या कामासाठी पूर्ण वेळ मिळावा म्हणून वेळेचे नियोजन आणि इतर सर्व जबाबदाऱ्या स्मितताई सांभाळत असत.



परांजपेसरांचा मनाचा मोठेपणा सांगणारे एकच उदाहरण पुरेसे आहे. १९८७ साल असावे, 'दूरदर्शन'ने 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमाअंतर्गत माझी मुलाखत घ्यायचे ठरले होते. त्या कार्यक्रमाची निर्मिती विजया जोगळेकर-धुमाळे यांनी केली होती. तेव्हा माझी मुलाखत घेण्यासाठी सतेज पोटे होते आणि त्यांच्याबरोबर एक चित्रकार हवा होता. त्यासाठी एका ज्येष्ठ चित्रकाराला विचारण्यात आले तेव्हा त्याने नकार दिला. तेव्हा मला संकोच वाटत असूनही मी परांजपेसरांकडे विचारणा केली. त्यांनी लगेच होकार दिला आणि त्यांनी माझी मुलाखत घेतली. खरे म्हणजे तो कार्यक्रम त्यांच्यावर करायला हवा एवढी थोर व्यक्ती, त्यांनी माझी मुलाखत घ्यावी, हा त्यांच्या मनाचा केवढा मोठेपणा.




रवी परांजपे यांनी विपुल चित्रसंपदा निर्माण केली. महाराष्ट्राचा हा सांस्कृतिक ठेवा आहे. त्यासाठी उच्च दर्जाचे संग्रहालय उभारल्यास ते त्यांचे खरे स्मारक ठरेल; जे पुढील पिढ्यांना प्रेरणादायी असेल!

**– दत्तात्रय पाडेकर**
dattapadekar@hotmail.com




# ह्याडाचा फोकस्ड

**सतीश तांबे**

**मराठी** साहित्यात गेली काही वर्षे अविनाश कोल्हे हे नाव अधिकाधिक ठळक होत चालल आहे. अलीकडेच त्याने नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या अभ्यासवृत्तीसाठी पाठवलेला एका माहितीधिष्ठित कादंबरीलेखनाचा प्रस्ताव मंजूर होऊन त्याला आता त्यासाठी अभ्यासवृत्तीही मिळाली आहे आणि हे सारे घडते आहे वयाची साठी ओलांडल्यावर! या लेखाला औचित्य आहे या अभ्यासवृत्तीचे.

अविनाशला मी गेली सुमारे ३५हून अधिक वर्षे ओळखत आहे. साहजिकच मी त्याच्या ह्या वाटचालीचा थोडाबहुत साक्षी आहे. त्याने लिहिलेल्या 'सेकंड इनिंग' ह्या पहिल्याच कथासंग्रहाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. नंतर त्याच्या 'चौकट वाटोळी' ह्या पहिल्याच कादंबरीला वर्धा येथून दाते पुरस्कार जाहीर झाला. त्यानंतर मॅजेस्टिक प्रकाशनाने आयोजलेल्या, भालचंद्र नेमाडे ह्यांच्या 'हिंदू' ह्या कादंबरीतील एखाद्या आशयसूत्राच्या अनुषंगाने कादंबरीलेखनाच्या स्पर्धेत भाग घेऊन त्याने लिहिलेल्या 'पंगतीतलं पान' ह्या कादंबरीला स्पर्धेत पहिलं आणि एकमेव बक्षीसही मिळालं. अविनाशला हे जमले ह्याचे कारण थोडक्यात सांगायचे तर तो पहिल्यापासूनच, सध्याच्या भाषेत ज्याला 'फोकस्ड' म्हणतात तसा आहे.



अविनाश कोल्हे


प्रापंचिक जबाबदाऱ्या नीटपणे पार पडल्यानंतर पुढच्या वयात नेटाने सुरू करायच्या ह्या लिखाणाची पायाभरणी त्याने विशीच्या आसपासच सुरू केली होती. खामगावला शालेय शिक्षण सुरू असताना अविनाशच्या घरी 'महाराष्ट्र टाइम्स' येत असे, जो त्याच्यासाठी अक्षरश: 'पत्र नव्हे मित्र' झाला होता. ह्यातून त्याला मुंबईपुण्याच्या सांस्कृतिक जगाची ओळख झाली आणि ओढही लागली होती. महाविद्यालयीन शिक्षणासाठी तो पुण्यात मोठ्या भावाकडे राहायला आला आणि त्याने फर्ग्युसनमध्ये प्रवेश घेतला, जिथे त्याला त्या काळात 'खुले मुलुखावेगळे विचार आणि साजेशी टवटवीत भाषा' ह्यासाठी साप्ताहिक 'माणूस'मधील लेखांमधून गाजलेल्या स.शि. भावे ह्यांची ओळख झाली. फोकस्ड माणसांना कोणाशी ऊठबस ठेवावी आणि कशी वाढवावी ह्याची नेमकी जाण असते. स.शि. भावे ह्यांच्याशी संवाद वाढवताना त्याने समांतरपणे लिहायलाही सुरुवात केली होती, ज्यामध्ये त्याने पु.ल. देशपांडे ह्यांच्यावर लिहिलेला चिकित्सक लेख हा भावे यांना आवडला आणि तो नंतर 'तात्पर्य'च्या अंकात प्रकाशितही झाला. स.शि. भावे ह्यांच्याकडून अविनाशची साहित्याची जाण आणि आवडदेखील वाढली.

पुण्यातून एमबीए केल्यानंतर नोकरीसाठी तो मुंबईला आला आणि इथे त्याच्या सांस्कृतिक विश्वाचा परीघ अधिकच

विस्तारला. शिवाय स.शि. भावे ह्यांच्या शिफारशीमुळे त्याला तेव्हा थेट मराठी साहित्याचे पताकास्थान समजल्या जाणाऱ्या 'मौज'च्या कार्यालयात सहजपणे प्रवेश मिळाला. इथे त्याची 'सत्यकथा'चे संपादक राम पटवर्धन ह्यांच्याशी मैत्री जुळली. पटवर्धनांच्या अभिरुचीविषयी भले मतभेद असतीलही, पण त्यांच्याएवढा चिकित्सक संपादक मराठीमध्ये गेल्या पन्नास वर्षांमध्ये झाला नाही ह्यावर बहुतेकांचे एकमत असावे. त्यामुळे त्यांच्या सहवासामध्ये अविनाशची साहित्यविषयक जाण आणि ओढ अधिकच वाढली. तसेच, त्याला काटेकोर संपादनाचे धडेही मिळाले. ह्याच अनुभवातून पुढे अविनाशने 'माणूस'च्या त्रैमासिकाच्या संपादनाचे काम १९८७-९१ असे पाच वर्षे बऱ्याचदा वीकएन्डला मुंबईहून पुण्याला अत्यंत निष्ठेने जा-ये करत केले. अविनाशच्या जडणघडणीमध्ये स.शि. भावे आणि राम पटवर्धन ह्यांच्याकडून झालेल्या संस्कारांचा मोठाच हिस्सा आहे.

मौजच्या कार्यालयात त्याचे जाणे-येणे १९८०-९५ असे सुमारे १५ वर्षे सुरू होते. ऑफिस सुटले की तो फोर्टातून खटाववाडीमध्ये यायचा आणि त्यावेळी तो पेइंग गेस्ट म्हणून गिरगावातच राहत असल्यामुळे तिथून त्याचे घर जवळच होते. पुढे तो वसईला राहायला गेल्यावरही त्याने मौजच्या कार्यालयात जाणे नेटाने सुरूच ठेवले. तिथे मान्यवर मराठी लेखकांचा नेहमीच राबता असायचा. ह्या सगळ्यांचे वागणे-बोलणे-चर्चा जिज्ञासू अविनाशला कायमच ऐकायला मिळायच्या. काहींशी तर त्याची गप्पाटप्पा होण्याएवढी मैत्रीही झाली. त्यामुळेच त्याच्या बोलण्याच्या ओघात साहित्यिकांच्या आठवणी, किस्से अगदी सहज येतात.

अविनाशला नाटक-सिनेमाची ओढ तशी गावात असल्यापासूनच होती. तिथे त्याला दर्जेदार नाटके-सिनेमा पाहायची संधी कमी मिळायची. पुण्यात त्याने बरीच मराठी नाटके पाहिली. १९८० साली मुंबईला आल्याआल्या तो 'प्रभात फिल्म क्लब'चा सभासद झाला आणि जगभरातील दर्जेदार चित्रपट पाहू लागला. मुंबईमध्ये आल्यावर तो मराठी व्यावसायिक-प्रायोगिक नाटकांच्या










जोडीनेच इंग्रजी-हिंदी भाषांतील नाटकेही पाहू लागला. निखिल वागळेने त्याला ह्या नाटक-सिनेमांची परीक्षणं लिहिण्यासंबंधी सुचवल्यावर त्याने ती गोष्ट एखादे व्रत घ्यावे तशी स्वीकारली. आजवर त्याने मुंबईतील रंगभूमीवर मंचित झालेल्या सुमारे साडेतीनशे अमराठी नाटकांची परीक्षणे लिहिली आहेत. ह्या लेखांचे 'रंगभूमीचे आंग्लरूप' हे एक संकलित पुस्तक लोकवाङ्मय प्रकाशनाने २०१६ साली प्रकाशित केले. शिवाय जागतिक राजकारणावरही त्याचे लेख येतच होते. तो काही काळ 'नवशक्ती'च्या संपादकीय विभागातही कार्यरत होता. तिथेच त्याने सुमारे दहा वर्षे 'इंग्रजी ग्रंथपरिचय' हे साप्ताहिक सादर चालवले ज्यात त्याने जवळजवळ साडेपाचशे इंग्रजी पुस्तकांची परीक्षणं लिहिली. तर अविनाश फिक्शन लिहीत नव्हता, तरी त्याचा हात असा सढळपणे लिहिता होता. कादंबरी लिहिण्यासाठी आवश्यक असलेली बैठक त्याने आधीच कमावलेली होती

अविनाश एमबीए होता आणि त्यानुरूप त्याला जाहिरातक्षेत्रात चांगल्या हुद्याची नोकरी होती. माझी आणि अविनाशची ओळख ह्या क्षेत्रामुळेच झाली. ह्या क्षेत्रात आपल्या हक्काचा हुकुमी फावला वेळ काढणे तसे अवघड असते. त्यामुळे अविनाशला त्याचा ध्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने ह्या नोकरीचा हळूहळू काच जाणवू लागला आणि त्याने प्राध्यापक व्हायचे डोक्यात घेतले. अविनाश हा मूळचा विज्ञानाचा पदवीधर आणि त्याला इच्छा होती राज्यशास्त्राचा प्राध्यापक व्हायची. त्यासाठी त्याला राज्यशास्त्रात एमए करता येणे शक्य होते. पण, मुंबई विद्यापीठात असेच faculty बदलून, एमए मराठीत सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होऊनही, माझी पदवी विज्ञानाची आहे आणि ugcच्या नियमानुसार ज्यामध्ये प्राध्यापकी करायची तो विषय पदवीपासून हवा, ह्या कारणामुळे मला नंतर NET उत्तीर्ण होऊन देखील प्राध्यापक होता आले नाही, ह्यापासून 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' होत अविनाशने चक्क फर्स्ट इयरपासून प्रवेश घेऊन एमए केले. दरम्यान तो एका जाहिरात कंपनीमध्ये व्हाइस प्रेसिडेंट झाला होता. परंतु

१९९७ साली वयाच्या चाळिसाव्या वर्षी त्याने चक्क जाहिरातक्षेत्रात त्याला मिळणाऱ्या पगाराच्या पंचवीस टक्क्यांपेक्षाही कमी पगारात रुपारेल कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली आणि पुढे वीस वर्षे मन लावून केली.

आपल्याला जे विदेशी नाटक-सिनेमे पाहायचेत ते वसईहून येऊन पाहणे हळूहळू अवघड होत जाईल, शिवाय नोकरी देखील मध्य मुंबईमध्ये आहे, हे लक्षात घेऊन त्याने मग वसईतून मध्य मुंबईमध्ये येण्याचा निर्णय घेतला. तो नियोजनपूर्वक अमलात आणून वडाळ्यासारख्या मध्यवर्ती वस्तीतील दोस्ती एकर्समध्ये फ्लॅट घेतला. अशा रीतीने अविनाशने आपल्या अंतरीचा ध्यास पूर्ण करण्यासाठी फोकस्ड म्हणतात तशी आखणी केली. सेवानिवृत्तीच्या नंतर फिक्शन लिहायचे हे त्याच्या मनात पक्के होते आणि त्यासाठी तो सातत्याने वाचन करत होता. मराठीतील समकालीन साहित्याच्या पटावर बारकाईने लक्ष ठेवून होता. वडाळ्याला राहायला आल्यावर शहरातील साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहणेदेखील त्याला जमू लागले.


सध्याच्या तरुणमंडळींना करिअरचे बाळकडू मिळाल्यामुळे ती आपोआपच फोकस्ड बनतात, पण अविनाश ज्या काळात वाढला होता त्या काळात बहुतेक जण ढिसाळ जगायचे. साहजिकच काळाच्या पुढे असलेल्या अविनाशबद्दल तो 'संधिसाधू' असल्याचा ग्रह अनेकांच्या बोलण्यात येतो, तो समजून घेण्यासारखा आहे. खरे तर अविनाश हा 'संधिशोधू' आहे, फार तर त्याला लटपट्याखटपट्या म्हणता येईल. तो आजही महाराष्ट्रातील महाविद्यालये, चर्चासत्रे, संमेलनांच्या व्यासपीठावर वक्ता म्हणून उपस्थित असतो. ह्यावर्षी उदगीरच्या साहित्यसंमेलनातही तो एका परिसंवादातील वक्ता होता. तसेच २०२२ मेमध्ये कोल्हापूरला भरलेल्या साठाव्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेचा तो एक परीक्षक होता. ह्याचं कारण एक तर त्याचा संपर्क दांडगा आहे आणि त्यासाठी लागणारे कंटाळवाणे सोपस्कार करायची त्याची तयारी असते. कुणाला सांगून कदाचित पटणार नाही, पण अविनाश दररोज चक्क चार इंग्रजी आणि तीन मराठी, तर रविवारी मराठीतील जवळपास सर्व महत्त्वाची वृत्तपत्रे वाचतो. त्यातून त्याला अशा संधी गवसत असाव्यात. त्याला काही चर्चासत्रांसाठी ऑस्ट्रिया, अमेरिका, इराण वगैरे देशांमध्ये जायचीही संधी मिळाली आहे. त्याला कोणतीही संधी कशी मिळाली हे विचारले तर तो ते मोकळेपणे सांगतो. जे ऐकून कळते की त्याच्या मनात संकोच, गंड, अवघडलेपण नाही आणि 'कामाला चाकं किंवा पंख नसतात, तर आपणच ते पुढे न्यावं लागतं' हे व्यावहारिक सत्य त्याला तरुण वयातच उमगलं आहे. जाहिरातक्षेत्रात काम केल्यामुळे आपले घोडे पुढे दामटल्याशिवाय विन पोस्ट गाठू शकत नाही हे त्याला अंतर्यामी ठाऊक आहे. ज्यातून तो फोकस्ड घडला असावा! अविनाशला ह्या लोकापवादाविषयी अजिबात खेद वा खंत वाटताना दिसत नाही. कारण त्याच्या मते एक तर तो जे काही करतो ते वैध मार्गाने करतो.

लवकरच त्याची एक कादंबरी प्रकाशित होत आहे. आणखी एका भरभक्कम कादंबरीचा पहिला खर्डा लिहून तयार आहे. शिवाय डोक्यात तीन-चार कादंबऱ्या तयार आहेतच. दरम्यान कुसुमाग्रज अभ्यासवृत्तीसाठी अविनाशने जो विषय निवडला आहे त्यावर एक सणसणीत कादंबरी वर्षभरात हातावेगळी होईलच! काहीही दखलपात्र करण्यासाठी 'फोकस्ड' असणे किती गरजेचे आहे, ह्याचे अविनाश हे वेगळ्या अर्थाचे 'साठोत्तरी' उदाहरण आहे.

**– सतीश तांबे**
satishstambe@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

# रवि मांद्रेकर लिखित दोन पुस्तके




## बाऊन्सर

**एमसीए प्रशासनावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न**


रवि मांद्रेकरांनी लिहिलेले हे पुस्तक म्हणजे एमसीएच्या गेल्या पस्तीस वर्षांचा इतिहासच आहे, मात्र तो गौरवशाली नाहीतर संघटनेच्या पतनाचा, भानगडींचा आणि भ्रष्टाचाराचा इतिहास आहे.

**मूल्य ४०० रु. सवलतीत ३०० रु.**

## BOUNCER

**The story of David and Goliath in MCA**

This book, written by Mr. Mandrekar, a crusading activist in the MCA for over thirty years, does fulfil this expectation, insomuch as it presents and account of the association, albeit not a glorious one.




**Price : Rs. 500 Discount : Rs. 300**



राजीव श्रीखंडे

# हंगर - केन्युट हॅमसन
## Hunger - Knut Hamsun

**प्रसिद्ध** नॉर्वेजियन लेखक केन्युट हॅमसनचा जन्म लॉम या गावात ४ ऑगस्ट १८५९ रोजी झाला. हे गाव गुडबॅण्डसलेन या निसर्गरम्य दरीत वसलेले आहे आणि त्यावेळी स्वीडन आणि नॉर्वे हा एक देश होता. केन्युट हॅमसनचे खरे नाव केन्युट पेडससेन असे आहे. आपल्या आईवडिलांच्या सात मुलांपैकी हा चौथा मुलगा. तो तीन वर्षांचा असताना त्याचे कुटुंब हॅमरॉय या ठिकाणी स्थलांतरित झाले. या कुटुंबाची आर्थिक स्थिती तशी हलाखीचीच होती.

केन्युट नऊ वर्षांचा असताना आपल्या कुटुंबापासून वेगळा झाला आणि त्याच्या काकांबरोबर राहायला लागला. त्याचे काका पोस्ट ऑफिस चालवत होते आणि त्यांना एका साहाय्यकाची गरज होती. मात्र त्यांनी केन्युटला फारच वाईट वागवले. ते त्याला मारहाण करत आणि उपाशीदेखील ठेवत. पुढे १८७४ मध्ये तो त्याच्या मूळ गावी लॉमला पळून गेला. पुढची पाच वर्षे त्याने पडेल ते काम केले. स्टोअर कारकून, चांभाराचा साहाय्यक, शेरीफचा साहाय्यक, अगदी प्राथमिक शाळेत त्याने शिक्षकाची नोकरीदेखील केली. वयाच्या सतराव्या वर्षी तो एका Ropemaker चा साहाय्यक बनला. त्याचवेळी त्याने लिहिण्यास सुरुवात केली. केन्युटने पैशाच्या एका मोठ्या व्यावसायिकाकडे मदतीची मागणी केली आणि त्याने केन्युटला मदत केली. पुढे त्याच्या अनेक कादंबऱ्यात येणारी मार्क ही व्यक्तिरेखा या व्यापाऱ्यावर म्हणजेच Erasmus Zahl वरच बेतलेली आहे.

केन्युटने त्याचे पहिले पुस्तक (The Enigmatic Man : A Love Story from Northern Norway) हे १८७७ साली प्रसिद्ध केले. त्याची पुढची कादंबरी Bjorger ही प्रसिद्ध लेखक Brornonच्या शैलीशी मिळतीजुळती आहे, जो Icelandicच्या गाथा लिहीत असे. हॅमसनला पहिले यश मिळाले ते १८९० साली, त्याच्या 'हंगर' या कादंबरीमुळे. पुढे त्याच्या अनेक प्रसिद्ध कादंबऱ्या आल्या - Mysteries, Pan, Under the Autumn Star, The Last Joy, Vagabounds, Rosa, Dreamers, Benoni आणि इतर काही. या बहुतेक कादंबऱ्यांचा मध्यवर्ती गाभा एका कायमच्या भटक्याच्या नजरेतून त्याला दिसणारे जग, हाच आहे. छोट्या गावांतले जीवन हा विषय आपल्याला केन्युट हॅमसनच्या बऱ्याच कादंबऱ्यांतून दिसतो.

केन्युट हॅमसनची आणखी एक प्रसिद्ध कादंबरी म्हणजे The Growth of the Soil. या कादंबरीच्या प्रकाशनानंतर तीनच वर्षांनी म्हणजेच १९२० मध्ये केन्युटला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले.

हॅमसन आता जागतिक कीर्तीचा लेखक बनला होता. एकामागून एक त्याची पुस्तके प्रकाशित होत होती. यामध्ये ऑगस्ट त्रयी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीन कादंबऱ्यांचा आवर्जून उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. १९२७ ते १९३३ या सहा वर्षांत या तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी आश्चर्याची गोष्ट म्हणजे हॅमसनने जर्मनीच्या नाझी राजवटीला पाठिंबा दिला. तो अनेक ज्येष्ठ जर्मन नेत्यांना भेटला. अगदी अडॉल्फ हिटलरलादेखील. १९४० साली हॅमसनने चक्क असे लिहिले की जर्मनी नॉर्वेसाठी लढाई लढत आहे. हिटलरच्या मृत्यूनंतर हॅमसनने त्याला मानवजातीचा सच्चा लढवय्या आणि सर्व देशांना न्याय देण्यासाठी झुंजणारा नेता अशी श्रद्धांजली वाहिली. त्यामुळे साहजिकच फार मोठा गदारोळ उठला. १४ जून १९४५ रोजी पोलिसांनी हॅमसनला देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. त्यावेळी हॅमसनचे वय ८६ वर्षांचे होते म्हणून त्याला तुरुंगाऐवजी ग्रीमस्टॅन्ड येथे एका इस्पितळात ठेवण्यात आले. १९४७ साली त्याच्यावरच्या खटल्याची सुनावणी झाली. देशद्रोहाच्या आरोपातून त्याची सुटका झाली तरी नाझींनी पाठिंबा

दिल्याबद्दल त्यांना दंड ठोठावण्यात आता. पुढे नॉर्वेच्या सर्वोच्च न्यायालयाने या दंडाची रक्कम कमी केली. हॅमसनने या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी असे प्रतिपादन केले, की नाझींनी जे अमानुष अत्याचार केले त्याबद्दल तो अगदीच अनभिज्ञ होता.


युद्धानंतर नॉर्वेजियन जनतेला त्यांच्या सर्वात प्रसिद्ध लेखकाच्या नाझी समर्थनाचे नेहमीच वैषम्य वाटत आलेले आहे. लेखक म्हणून त्याची थोरवी गाताना, नाझींच्या पाठिंब्याविषयी त्याच्यावर प्रचंड टीका करायला नॉर्वेजियन जनतेने कधी माघार घेतली नाही. इंग्रजांविषयी त्याच्या मनात उसळलेला कमालीचा राग हे कदाचित नाझीसमर्थनाचे एक प्रमुख कारण असू शकेल.

केन्युट हॅमसनला त्याच्या पहिल्या बायकोपासून एक मुलगी झाली, पण हे लग्न फार टिकले नाही. तो पुढे Maria Andersen या एका होतकरू नटीशी लग्न केले. मारियाने मग आपली अभिनयाची कारकीर्द संपुष्टात आणली.

केन्युट हॅमसनचा १९ फेब्रुवारी १९५२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी ग्रॅमस्टॅन्ड येथे मृत्यू झाला. त्याच्या अस्थी त्याच्या नॉरहोममधील घराच्या बगीच्यात पुरलेल्या आहेत.



केन्युट हॅमसन




आणि निसर्ग ही एकाच शक्तीची दोन रूपे आहेत असे तो म्हणत असे. त्याच्या कादंबऱ्यांत, कथांत त्याच्या प्रमुख व्यक्तिरेखांची निसर्गाशी असलेली जवळीक सहज दिसते, त्यावर तो कटाक्षाने भर देतो. मनाच्या व्यापारांनाच कथेच्या केंद्रभागी ठेवण्याचा एक संपूर्ण नवा साहित्यप्रकार केन्युट हॅमसनने सुरू केला, असे म्हणणे वावगे ठरू नये.

त्याच्या कादंबऱ्या, कथा आजही अतिशय लोकप्रिय आहेत, त्याच्या नाझीसमर्थनाविषयी बहुतेक जणांच्या मनात नाराजी असूनदेखील हॅमसनच्या बऱ्याच कादंबऱ्यांवर आधारित अनेक चित्रपट आलेले आहेत. त्याच्या आयुष्यावर आधारित एक चित्रपट १९९६ साली प्रसिद्ध झाला. आज हॅमसनची वेगवेगळ्या ठिकाणी असलेली तीन घरे म्युझियम म्हणून लोकांसाठी खुली आहेत. हॅमरॉय या गावी केन्युट हॅमसन सेंटर कार्यरत आहे.

विसाव्या शतकाच्या सगळ्याच साहित्यावर फार मोठा प्रभाव टाकणारा, जागतिक साहित्याला एक वेगळे अनोखे वळण देणारा हा एक अलौकिक लेखक आहे हे तर आता जगमान्य झालेलेच आहे!

केन्युट हॅमसनने आयुष्यभर भरपूर लिखाण केले. कादंबऱ्या, कथा, नाटके, कविता, ललित लेखन हे सर्व वाङ्मयप्रकार त्याने अतिशय समर्थपणे हाताळले. तरी त्याची खरी कीर्ती आहे ती एक विलक्षण कादंबरीकार म्हणूनच. जागतिक वाङ्मयाच्या गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासात एक फार मोठा प्रतिभावान, नावीन्यपूर्ण लेखक असा त्याचा लौकिक आहे. जागतिक वाङ्मयाच्या जडणघडणीत त्याचा फार मोठा प्रभाव आहे. त्याच्या लिखाणाचा प्रभाव Thomas Mann, Franz Kafka, Maxim Gorky, Stefan Zweig, Hermann Hesse, Henry Miller, John Fante, Ernest Hemingway अशा अनेक जगप्रसिद्ध साहित्यिकांच्या लिखाणावर झालेला स्पष्ट दिसतो. प्रसिद्ध ज्युईश लेखक इझाक बाझेव्हीस सिंगरने तर असे म्हटले आहे की केन्युट हॅमसन हा आधुनिक जागतिक साहित्याचा मूळ प्रेरणास्थान आहे. त्याची रसाळ, ओघवती शैली ही तर साहित्याच्या नव्या बदलत्या कथनशैलीची उद्गाती आहे.

त्याच्या लिखाणात निसर्गाची अत्यंत विभिन्न आणि प्रत्ययकारी रूपे आपल्याला दिसतात. मानवी मनाचे सूक्ष्म निरीक्षण हाच खरा लेखनाचा गाभा असला पाहिजे असे केन्युट म्हणत असे. वास्तववादाला त्याचा प्रथमपासूनच विरोध होता. मानव

आता आपण 'हंगर' या कादंबरीकडे वळूया.

ही कथा घडते ख्रिस्तीयाना या नॉर्वेच्या राजधानीत. हेच नॉर्वेची राजधानी असलेल्या ऑस्लोचे पूर्वीचे नाव होते. एका सकाळी भाड्याच्या एका खोलीत राहत असलेला एक माणूस त्याच्या दिनचर्येची सुरुवात करतो. हा माणूस म्हणजेच कादंबरीचा निवेदक असलेला कथानायक आहे. तो एका अटीकमध्ये राहत असतो. त्या सकाळी तो उठतो, आपल्या खोलीचे जणू नव्याने पूर्ण निरीक्षण करतो. त्या खोलीच्या भिंतीवर अनेक पोस्टर लावलेली असतात. त्यात दीपस्तंभाच्या कार्याध्यक्षांचे पत्र अगदी मोक्याच्या जागी लावलेले असते, एका प्रसिद्ध वृत्तपत्राचे काही जुने अंकही भिंतीला चिकटवलेले असतात. आपला कथानायक मग खिडकी उघडून त्याच्या समोर पसरलेल्या शहरांचे खूप वेळ अवलोकन करतो. हेमंतऋतूचे दिवस असतात. त्याची खोली त्याच्या दारिद्र्याची साक्ष देणारीच असते. त्या खोलीमध्ये एक झुलणारी खुर्ची असते आणि आपल्या नायकाला त्या खुर्चीत बसून, वेगवेगळ्या गोष्टींवर विचार करत, झुलण्याची सवय असते. ही खुर्ची लाल रंगाची असते. आपला नायक सबंध खोली शोधून सकाळच्या नाश्त्यासाठी काही मिळते का ते बघतो, पण त्याला काहीच मिळत नाही. आपल्या या परिस्थितीबद्दल तो विचार करतो. काही एखादी नोकरी मिळेल याची

त्याला फारशी आशा नसते. त्याने बऱ्याच ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केलेले असतात, पण त्याला कुठेच यश मिळालेले नसते. त्याची अवस्था त्या सकाळी फारच दयनीय असते. काही काम नाही, कामाची आशा नाही, खिशात दमडी नाही अशा अवस्थेत तो असतो. त्या सकाळी काही न खाताच एक कागद आणि पेन्सिल घेऊन तो घराबाहेर पडतो. तेव्हा सकाळचे नऊ वाजलेले असतात.

शहराचा दिवस आता सुरू झालेला असतो. रस्त्यावरून फिरताना काही कारण नसताना आपल्या कथानायकाला आनंदी वाटू लागतं. रस्त्यावरच्या वर्दळीचे निरीक्षण करत तो चालू लागतो. सकाळच्या प्रसन्न वातावरणात चालण्याव्यतिरिक्त कुठलाच उद्देश त्याच्या मनात नसतो. चालताना तो गुणगुणू लागतो. काहीच खाल्लेले नसल्याने रस्त्यावरच्या एका स्टॉलवर सॉसेजेस दिसल्यावर त्याची पावले आपसूकच तिकडे वळतात. तिथे एक बाई उभी असते. तिच्या तोंडात एकच दात असतो, बाकी बोळकेच असते. ते बघून आपल्या नायकाला शिसारी येते. तो तिकडे थांबतच नाही.

चालताना एक वृद्ध लंगडा माणूस त्याच्या पुढे चालताना दिसतो. त्याच्या हातात कपड्यांचे एक गाठोडे असते. वाटेत त्याला त्याच्या ओळखीचा एक माणूस भेटतो, पण तो आपल्या नायकाला गडबडीत अभिवादन करून पुढे जातो. हे असे का याचे विचार आपल्या नायकाच्या मनात घोळू लागतात. त्या वृद्ध माणसाच्या लंगड्या चालीमुळेही आपल्या नायकाची बेचैनी वाढत जाते. त्याच्यामुळे त्याच्या प्रसन्न वृत्तीला धक्का बसतो. शेवटी तो त्याला गाठतो तेव्हा तो दुधासाठी त्याच्याकडे थोड्याशा पैशाची मागणी करतो. चौकशीअंती आपल्या नायकाला कळते की तो वृद्ध एक चांभार आहे. त्याला तिकडेच थांबण्याची व्यवस्था करून तो एका सावकाराच्या दुकानात जाऊन स्वतःचा कोट गहाण ठेवतो, पैसे घेतो आणि परत येऊन त्या वृद्ध माणसाला देतो. तो वृद्ध आश्चर्यचकित होतो आणि आपल्या नायकाच्या एकंदर अवताराचे जवळून निरीक्षण करतो. मग तो त्याला दिलेले पैसे आपल्या नायकाला परत देतो. याचा आपल्या नायकाला प्रचंड राग येतो आणि तो तिकडून तावातावाने निघतो. पुढे तो थोडेसे चिप्स आणि ब्रेड विकत घेऊन ते खातो. खूप वेळाने त्याने काहीतरी खाल्ल्यामुळे त्याला समाधान मिळते.

त्याला मग लेख लिहावासा वाटू लागतो. एखादा मार्मिक तत्त्वज्ञानी लेख. पण त्याला आठवते की त्याची पेन्सिल त्याच्या कोटाच्या खिशातच राहिलेली असते आणि तो कोट त्याने सावकाराकडे गहाण टाकलेला असतो. तो त्या सावकाराच्या दुकानाकडे जायला निघतो, वाटेत त्याला त्याच्या समोर चालत असलेल्या दोन बायका दिसतात. त्यांना ओलांडून पुढे जाताना त्याची त्यातल्या एका बाईशी नजरानजर होते आणि ती लाजते. ते बघून आपल्या नायकाचा मूड फार बदलतो. तो जवळ जाऊन तिला विचारतो की तुझे पुस्तक हरवले आहे का? ती गोंधळते, पण चालायची थांबत नाही. तो दोघींचा पाठलाग करू लागतो. त्या दोघी घाबरतात आणि जलद चालू लागतात. त्यांच्या मोठ्या घरी पोचतात आणि आत जातात. आपला नायक बाहेरच उभा राहतो, बेफिकीरपणे. काही वेळाने तो परत फिरतो.

सावकाराच्या दुकानातून आपल्या कोटाच्या खिशातून तो आपली पेन्सिल परत मिळवतो. परत तो शहराच्या रस्त्यांवरून फिरू लागतो. देवाने आपल्यावर अशी वेळ का आणली आहे, त्याचा उद्देश काय आहे हा विचार त्याच्या मनात घोळू लागतो. एका मैदानात तो एका बाकावर विसावतो आणि काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न करतो, पण पहिल्या काही ओळींपलीकडे तो जाऊ शकत नाही. थोड्या वेळाने तिकडे एक लहानखुरा वृद्ध येतो तो आपल्या या नायकाच्या बाकाशेजारीच एका बाकावर बसतो. खरा तो अनोळखी असतो पण आपला नायक त्याच्याकडे जाऊन त्याच्याशी बोलू करतो. गप्पांच्या ओघात तो त्याला वृद्धाला स्वतःचा एक काल्पनिक पत्ता सांगतो. आश्चर्य म्हणजे तो वृद्ध तो पत्ता आणि त्या घराचा मालक आपल्याला माहीत आहे असे सांगतो. आपला नायक त्या मालकाचे खोटेच नाव त्याला सांगतो, कारण हा मालक प्रत्यक्षात अस्तित्वातच नसतो. तो वृद्ध त्यालाही योग्य प्रतिसाद देतो. त्या मालकाविषयी आपला नायक वाटेल त्या थापा मारतो आणि तो वृद्ध त्याला दुजोरा देत राहतो. अखेर आपल्या नायकाला हा प्रकार असह्य होतो आणि तो त्या वृद्धावर डाफरतो. त्याला ओरडून सांगतो की सगळे खोटे आहे. तो वृद्ध घाबरून तिकडून पलायन करतो.

त्या मैदानातून निघून तो चोरपावलांनी त्याच्या खोलीकडे परततो. त्याचे काही महिन्यांचे भाडे थकीत असते आणि त्यामुळे त्याच्या मालकीणबाईचा त्यासाठी तगादा चालू असतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर त्याला एका कथेची कल्पना सुचते. तो ही कथा झरझर कागदावर लिहून काढतो. मग तो त्याच्या मालकिणीचा डोळा चुकवून बाहेर पडतो. रात्रीच्या पावसाने चमकणाऱ्या रस्त्यांवरून परत फिरू लागतो. त्याने स्वतःची खोली आता सोडलेली असते. तो भुकेने बेजार झालेला असतो. फिरता फिरता संध्याकाळ होते. एके ठिकाणी तो विश्रांतीसाठी बसतो आणि तेथेच त्याला झोप लागते. उठतो तेव्हा दुपार झालेली असते. परत त्याचे फिरणे चालू होते. दमलेला, भुकेला असा तो एका दुकानात जातो. जिथे त्याने नोकरीसाठी अर्ज केलेला असतो, पण ती जागा अगोदरच भरलेली असते. रात्री कुठे झोपावे अशा विचारात तो असतो. शेवटी तो परत आपल्या खोलीकडे परततो, तिथे त्याला समजते की त्याची कथा एका नियतकालिकाने स्वीकारलेली असते आणि त्याचे पैसेही ठरलेले असतात. तो आनंदात असतानाच कादंबरीचा पहिला भाग संपतो.

कादंबरीचा दुसरा भाग सुरू होतो तेव्हा काही आठवड्यांचा कालावधी गेलेला आहे. आपल्या नायकाकडे त्याला कथेमुळे मिळालेले पैसे आता संपलेले असतात. तो पुन्हा अन्नाशिवाय असतो. अशाच एका संध्याकाळी तो बाहेर पडतो. एका बाकावर विश्रांतीसाठी बसलेला असताना त्याची एका पोलिसाशी गाठ पडते. त्याच्या एकंदर अवस्थेकडे बघून तो पोलीस त्याला घरात जाऊन, निराधार असल्याचे सांग असे सांगतो. त्याप्रमाणे आपला कथानायक जातो. आपले खोटेच नाव सांगतो आणि आपण

पत्रकार असल्याचेही खोटेच सांगतो. तिथेच तो रात्र काढतो. रात्री त्याला वेगवेगळी, भलती स्वप्ने पडतात. सकाळी तो बाहेर पडतो, पण तो अजूनही भुकेलेलाच असतो. त्याने लिहिलेल्या कथांचे हस्तलिखित अजूनही त्याच्याकडेच असते. तो त्याच्या ओळखीच्या एका माणसाला भेटायला जातो. मात्र तो घरी नसल्यामुळे त्याची भेट होत नाही. शहरात फिरताना एक वेळ त्याची भूक इतकी अनावर होते की तो पेन्सिलीचा तुकडा चावू लागतो. तो परत त्या वर्तमानपत्राच्या संपादकाकडे जातो. तोही त्याच्या कार्यालयात नसतो. शेवटी रात्री तो परत आपल्या खोलीकडे वळतो तेव्हा तिथे त्याला त्याच्या जुना ओळखीचा एक माणूस भेटतो. त्याला आपल्या कथानायकाची अवस्था बघून दया येते आणि तो त्याला आपल्याबरोबर नेऊन खायला घालतो. थोडे पैसेही देतो. यासाठी तो आपले घड्याळ सावकाराकडे गहाण टाकतो कारण त्याचीही स्थिती गरिबीचीच असते.

पुढे आठवडाभर आपला नायक तीन-चार वृत्तपत्रीय लेखांवर काम करतो. त्याचे पैसे संपत चाललेले असतात. तो कमांडर या नावाने प्रसिद्ध असलेल्या एका वृत्तपत्रीय संपादकाकडे जातो. तो त्याचा लेख वाचण्यासाठी ठेवून घेतो आणि आपल्या नायकाची अवस्था बघून त्याला अडव्हान्स देण्याची तयारी दाखवतो आपला नायक ते नाकारतो. दर रात्री चालायला बाहेर पडण्याचा त्याचा नित्यनेम चालू असतो. पैसे संपल्यामुळे त्याच्यावर उपासमारीची वेळ आलेली असते. एके दिवशी सकाळी भूक असह्य होऊन तो हाताची बोटेदेखील चावतो. आपण मरणाच्या वाटेवर असल्याची भावना काही केल्या त्याच्या मनातून जात नाही. एके सकाळी तो आपले बोट चावतो आणि त्यामुळे तो भानावर येतो. खाली उतरून तो एका दुकानात जातो तिथे त्याला पैशाची पेटी उघडी दिसते. त्यातले काही पैसे शिताफीने उचलून तो पोबारा करतो. मग तो एका रेस्टॉरंटमध्ये जाऊन भरपूर जेवतो, पण त्याला खाण्याची कित्येक दिवस सवय नसल्यामुळे ते अन्न बाहेर येते. शेवटी तो एका ठिकाणी उकळलेले दूध हळूहळू पितो. पुढे बरे वाटल्यावर तो घरी येतो. तेथे त्याला एक मुलगी त्याच्या दाराजवळ उभी असलेली दिसते. मागे त्याने ज्या दोन मुलींचा पाठलाग केलेला असतो त्यापैकी ती एक आहे, हे तो लगेच ओळखतो. त्याच्या गप्पा सुरू होतात. तिला त्याची ओळख पटते. तो तिला तिच्या घरापर्यंत सोडतो. दार बंद करताना ती त्याचे चुंबन घेते.

दुसऱ्या दिवशी बर्फ पडत असताना त्याचे नेहमीचे शहरातील भ्रमण चालू असते. आपण पैसे चोरले ही बाब त्याच्या मनाला खात असते. शेवटी ते पैसे तो एका वृद्ध भिकारणीला देऊन टाकतो. मग तो त्या दुकानात जाऊन काम करणाऱ्या माणसाला त्याने त्याचे पैसे चोरले असे सांगतो. पण तो माणूस त्याबद्दल जरा उदासीनच असतो. त्यामुळे आपल्या नायकाचे डोके फिरते. तो तसाच तावातावाने बाहेर पडतो त्याच्या भुकेमुळे त्याला विचित्र वाटत असते. शेवटी तो एका हाडकाची भीक मागतो. ते त्याच्या कुत्र्याला खायला हवे आहे असे खोटेच सांगून ते हाडूक तो चोरण्याचा प्रयत्न करतो. पण मग त्याला शिसारी येऊन त्याच्या पोटातले सगळेच बाहेर येते. अशा परिस्थितीत तो बंदरावर जाऊन जहाजावरील नोकरीची चौकशी करतो तेथेही त्याला अपयश येते. पुढे त्याला कमांडर भेटतो. त्याची अस्वस्था पाहून त्याला थोडे पैसेही देतो. त्यामुळे एका लॉजमध्ये आपला नायक राहायला जातो.

दोन तीन दिवसांनी तो बाहेर असताना त्याला ती मुलगी भेटते. ते दोघे तिच्या घरी जातात आणि गप्पा मारू लागतात. त्या ओघात आपला नायक आपली कहाणी त्या मुलीला सांगतो. ती ऐकून ती मुलगी चांगलीच घाबरते. आपला कथानायक वेडा असल्याची तिला खात्रीच पटते. त्याला ती घराबाहेर काढत नाही तरी तिच्यातला उन्माद पूर्ण नाहीसा होतो. हे लक्षात आल्यावर आपला नायकही द्विधा मनःस्थितीत तिचा निरोप घेतो. पुढे हिवाळा सुरू होतो. त्याला मिळालेल्या पैशामुळे आपला नायक त्या लॉजमध्येच राहत असतो. ते पैसे आता संपलेले असतात. तो उधारीवरच राहत असतो. त्या लॉजची मालकीण पैशासाठी त्याच्या मागे तगादा लावत असते. जगण्याविषयीच्या विचित्र अनास्थेमुळे त्याला काहीच करायची इच्छा नसते. लॉजच्या खिडकीत उभे राहत बाहेर घडणारे प्रसंग बघण्याची त्याला सवय लागलेली असते. बरेच वेगवेगळे प्रसंग त्याच्या नजरेसमोर घडतात. एकेदिवशी त्याच्या लॉजची मालकीण त्याला खोली रिकामी करण्याची आज्ञा देते. पण त्याच्यावर दया येऊन ती खाली त्याच्याबरोबर त्याला राहण्याची परवानगी देते. खाली ते सगळे कुटुंबच रहात असते. असेच काही दिवस जातात. मधूनमधून त्याची त्याच्या ओळखीच्या काही लोकांची भेट होते. एकेदिवशी तो त्या मुलीला एका श्रीमंत माणसाबरोबरही बघतो. त्यामुळे त्याच्या नैराश्यात भरच पडते. त्यातच त्या कुटुंबातल्या वृद्ध गृहस्थाला एका रात्री पक्षाघाताचा झटका येतो. वैतागून ती मालकीणबाई आपल्या नायकाला घर सोडून जायला सांगते. पण तिचा नवरा तिला थांबवतो. आपल्या नायकाला तो ती रात्र घरात काढायला परवानगी देतो. दुसऱ्या दिवशी सकाळी तो ते घर सोडतो.

काहीतरी लिहिण्याचा त्याचा दिवसभराचा प्रयत्न अयशस्वीच होतो. रात्री आपसूकच त्याची पावले त्याच्या पूर्वीच्या घराकडे वळतात. त्याला बघताच लॉजची मालकीणबाई पोलिसांना बोलावण्याची धमकी देते. तेवढ्यात त्याला एक पार्सल येते, ज्यात काही पैसे असतात. ते पैसे आपल्या मालकीणबाईच्या तोंडावर फेकून तो बाहेर पडतो. थोड्यावेळाने आपण हिशोबापेक्षा जास्त पैसे तिला दिल्याची त्याला जाणीव होते आणि त्याला पश्चात्ताप होतो, पण परत फिरण्याची त्याची हिम्मत होत नाही. ते पैसे त्या मुलीकडून आले असल्याची त्याला खात्री पटते आणि तो शरमतो. असाच विमनस्क मनःस्थितीत तो बंदरावर जातो. अचानक त्याच्या मनात वेगळाच विचार येतो. तो परत नोकरीची चौकशी करतो आणि एका जहाजावर त्याला नोकरी मिळते. ते जहाज इंग्लंडला जाण्याच्या तयारीतच असते. आपला नायक लगोलग जहाजावर रुजू होतो आणि ते जहाज थोड्याच वेळात प्रयाण करते. इथेच ही कादंबरी संपते.

हॅमसनची ही कादंबरी तशी छोटेखानीच आहे. पावणेदोनशे पानांची. ही त्याने चार भागात विभागलेली आहे. एका अर्थी या

कादंबरीला एक एकसंध कथानक असे काहीच नाही. ख्रिस्तीयाना शहरात, दारिद्र्यावस्थेत रहाणाऱ्या एका तरुण माणसाचे, हे आत्मकथन आहे. हा कथानायक या कथेचा निवेदक आहे. हा कथानायक निनावी आहे. म्हणजे संपूर्ण कादंबरीत त्याचे नाव काय हे आपल्याला कधीच कळत नाही. त्याला एका विशिष्ट कालावधीत नॉर्वेच्या राजधानीच्या नगरात जे अनुभव येतात ते त्याने या कादंबरीत कथन केलेले आहेत. हे अनुभव विभिन्न जरी असले तरी त्यातला एक समान धागा म्हणजे कथानायकाची एकूण परिस्थिती आणि त्याची मनःस्थिती. खिशात पैसे नाहीत, हातात काम नाही, पोटात अन्न नाही, अशा विपन्नावस्थेत असलेल्या या नायकाला आलेल्या एका विशिष्ट कालखंडातील विविध, चित्रविचित्र अनुभवांचे चित्रण हेच या कादंबरीचे कथानक आहे. वेगवेगळ्या प्रसंगांत या कथानायकाची वेगवेगळ्या व्यक्तींशी गाठ पडते, त्यांच्यात संवाद घडतात, वेगवेगळे प्रसंग घडतात. एका प्रसंगाचा दुसऱ्या प्रसंगाशी तसा फारसा संबंध नाही, यातला समान दुवा म्हणजे आपल्या कथानायकाचा त्या प्रसंगांत असलेला सहभाग. हा कथानायक अर्धपोटी आणि भ्रमिष्टावस्थेत असतो. या परिस्थितीमुळे त्याला येणाऱ्या अनुभवांची तीव्रता वाढते हे हॅमसन सूचित करतो आहे.

हे कथानक विविध प्रसंगांनी भरलेले आहे. हॅमसनचा भर या प्रत्यक्षात घडत असलेल्या प्रसंगांपेक्षा कथानायकाच्या मनात चालणाऱ्या विचारांवर, भावनांवर, विकारांवर जास्त आहे. हा नायक बुद्धिजीवी आहे, त्याच्या मनात कांट आणि नित्सेचे संदर्भ सहज येतात. कधी कधी कांटचे विचार खोडून काढण्याची ऊर्मीही त्याच्या मनात येते. त्यामुळे त्याला दिसणाऱ्या घटना, त्या घटनांचे त्याला होणारे आकलन याला वेगळा संदर्भ प्राप्त होतो. आपल्या नायकाचे वेगवेगळ्या विषयांवर सतत चाललेले चिंतन हाच या कादंबरीचा खरा गाभा आहे. वरवर पाहता विस्कळीत वाटणाऱ्या या कादंबरीचे कथानक हॅमसनने अतिशय नावीन्यपूर्णरीत्या बांधलेले आहे हे मात्र खरे!

या कादंबरीच्या कथनावर आपल्या नायकाच्या मनःस्थितीची दाट छाया अतिशय प्रकर्षाने पडलेली आपल्याला जाणवते. घडणाऱ्या प्रसंगांना, बाहेरील जगालादेखील हॅमसनने या कथनशैलीच्या आधारे एक वेगळेच रूप दिलेले आहे. जणू हे जग सत्य आणि स्वप्न यांच्या सीमारेषेवर घोटाळते आहे. आपला नायक या कादंबरीत बहुतेक वेळी भुकेला असतो. त्यामुळे भुकेवर कादंबरीत आपल्याला अस्वस्थ करणारे असे विवेचन आहे. या विवेचनावर नायकाच्या प्रत्यक्षातल्या हताश परिस्थितीची झाकही आहे. नायकाच्या या विशिष्ट परिस्थितीमुळे त्याच्या मनाचे व्यापार कसे होतात, कसे आहेत हेच या कथानकाचे मूळ सूत्र आहे आणि हॅमसनने ते अतिशय समर्थपणे आपल्यासमोर उलगडले आहे. वेगवेगळ्या घटनांचा संदर्भ आपल्याला नेहमी समजला नाही आणि घडणाऱ्या घटना रोजच्या जीवनातल्या सामान्य घटनाच असल्या तरी आपल्या नायकाच्या मनातल्या भावनांचे हिंदोळे या साध्या घटनांनादेखील जणू असामान्य रूप देतात. त्यामुळे ही कादंबरी अतिशय वाचनीय झाली आहे. अशा संदिग्ध कथानकाची कादंबरी हॅमसनच्या लेखणीच्या असाधारण ताकदीमुळे अतिशय प्रभावशाली झालेली आहे.

या कादंबरीत अनेक घटना घडत असताना नायकाच्या मनात विचारांचे थैमान चालू असते. या दोहोंचेही हॅमसनने अतिशय तपशीलवार वर्णन केलेले आहे. अशा कथानकाला, त्याच्या मांडणीला कथानकाच्या नेहमीच्या वेगाच्या कल्पना लागू पडतच नाहीत, तरीही आपली पकड घेण्यात ही कादंबरी कमालीची यशस्वी ठरते.

हॅमसनच्या भाषेत प्रचंड ताकद आहे. भाषा अतिशय सरळ, सोपीदेखील आहे. मानवी विकारांच्या प्रत्येक लहानसहान छटेचे यथार्थ वर्णन करणारी अशी ही ओघवती भाषा आहे. आपला नायक ज्या परिस्थितीत ही कथा आपल्याला सांगतो आहे त्या परिस्थितीचे अतिशय नेमके भान या भाषेत आहे. नायकाच्या मनात घोंगावणारी असबंद्ध, अतिरेकी वादळे, प्रत्यक्ष जगात घडणारे सामान्य प्रसंग आणि भुकेची नायकावर असलेली विक्राळ सावली हे सगळे आपल्यासमोर अतिशय परिणामकारकरीत्या उभे करणारी अशी हॅमसनची ही आपल्याला गुंगवून ठेवणारी भाषा आहे.

या कादंबरीत संवाद आहेत आणि तशीच नायकाची मनोगतेही आहेत, जी अंतर्गत संवादांच्या रूपातच आहेत. या अंतर्गत संवादांची तीव्रता जास्त आहे. या दोहोंचा समन्वय हॅमसनने अतिशय कल्पकतेने साधलेला आहे. खरे सांगायचे तर संवाद आणि मनोगत असे दोन प्रवाह एकाच वेळी तेवढ्याच प्रभावीपणे सादर करायला त्याच ताकदीची लेखणी पाहिजे. हॅमसन हे इतके सहजगत्या करतो की संवादांतून मनोगताकडे किंवा मनोगतांतून संवादांकडे होणारे हे स्थित्यंतर आपल्याला जराही वावगे वाटत नाही. नायकाच्या मनोगतांमध्ये एकंदर मानवी स्थितीविषयी इतके विलक्षण विवेचन आहे की ते आपल्या काळजात घर करून राहते. मूलगामी विचार अगदी सोप्या भाषेत सांगणारे असे हे संवाद आणि मनोगते आहेत.

या कादंबरीत खरे तर एकच मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे आणि तो म्हणजे आपला निनावी नायक. बाकीच्या व्यक्तिरेखांचा वावर या कथानकात अगदी मर्यादित आहे, तरी त्यांचाही या कथानकावरचा प्रभाव जाणवतो.

मानवी मन हाच साहित्याचा केंद्रबिंदू असला पाहिजे ही क्रांतिकारी कल्पना जागतिक साहित्यात रुजवणारी ही अजोड कलाकृती हॅमसनच्या असाधारण लेखणीच्या सामर्थ्याची एक पावतीच आहे, हे मात्र खरे!

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com



शरद काळे

# निसर्गऋणप्रकल्प - वास्तव आणि अपेक्षा



**जैविक** कचरा आणि प्लॅस्टिक कचरा या मुख्यत्वे दोन प्रकारच्या कचऱ्यांमुळे कचराव्यवस्थापनाचे तीन तेरा होत आहेत, ही बाब सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. ह्या कचरा व्यवस्थापनात प्रत्येक नागरिकाचा सहभाग असल्याशिवाय त्यात यश येणार नाही ह्यावर सविस्तर चर्चा आपण या लेखमालेत केली आहे. त्यात सुचवल्याप्रमाणे प्रत्येक घर खऱ्या अर्थाने शून्य कचरा होण्यास अजून एक ते दोन पिढ्या लागतील, कारण तेवढी प्रगल्भता समाजात रुजण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यामुळे नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या समोर असलेली ही समस्या अजून काही दशके तरी तशीच राहणार आहे. विकेंद्रित कचराव्यवस्थापन हे अंतिम ध्येय असले पाहिजे, त्यासाठी लोकशिक्षण आणि लोकसहभाग जास्तीत जास्त कसा वाढवता येईल या दृष्टीने राजकीय पातळीवर चांगली यंत्रणा उभारण्याची गरज आहे. नगरपालिकांच्या कचराव्यवस्थापन कार्यक्रमात यासाठी नागरी सुविधा केंद्र (कचराव्यवस्थापन) करण्याची गरज आहे. यशदा, रचना संसद, आणि विविध सेवाभावी संस्थांनी आपल्या पुढील वाटचालीत या दृष्टीने आवश्यक ते फेरफार करून यात सुसूत्रता आणली व तसे प्रशिक्षण आणि निर्माणकार्य सुरू केले तर हे शिवधनुष्य उचलता येईल.

निसर्गऋण जैववायू प्रकल्पाची निर्मिती, जैविक कचऱ्यावर सूक्ष्मजीवांच्या माध्यमातून प्रक्रिया करून त्यातील मूलद्रव्ये निसर्गाकडे पुन्हा वापरता येतील, अशा तऱ्हेने पाठवण्यासाठी करण्यात आली आहे. कचरा रस्त्यावर किंवा उकिरड्यावर फेकून दिला, तरी त्याचे शेवटी विघटन होते हे सत्य असले तरी तो मार्ग योग्य नाही. कारण एक तर अशा अनियंत्रित विघटनात योग्य त्या सूक्ष्मजीवांचा सहभाग असेल याची खात्री नसते. उकिरड्यावर फेकल्या जाणाऱ्या बाबींत प्लास्टिकसारख्या कचऱ्याचाही समावेश असल्यामुळे हे विघटन मंद तर होतेच, पण त्यातून रोगराई पसरवणारे जंतूही वाढू शकतात. ते अस्वच्छतेचे आणि दुर्गंधी निर्माण करणारे वातावरण आजूबाजूच्या लोकांच्या आरोग्यासाठी नक्कीच विघातक असते. उकिरड्यावर भटकी जनावरे आणि विशेषतः कुत्र्यांची चलती असते. त्यांचा धोका तर असतोच, तशीच अनेक ठिकाणी दुभती जनावरेदेखील उकिरड्यावर अन्न शोधतात. या सर्व जनावरांच्या पोटात या फेकलेल्या अन्नबरोबर प्लास्टिकदेखील जाते व त्याचे भयानक परिणाम त्या जनावरांना भोगावे लागतात आणि मग एकूणच पर्यावरणाला भोगावे लागतात.

विकेंद्रित स्वरूपात जैविक कचरा वैयक्तिक आणि गृहनिर्माण

संस्थांच्या, छोट्या आस्थापनांच्या पातळीवर कसे करता येईल हे आपण पाहिले. जिथे फार मोठ्या प्रमाणावर म्हणजे एक टनाहून अधिक जैविक कचरा निघतो, त्या ठिकाणी हे कचराव्यवस्थापन अतिशय आव्हानात्मक असते. एक टनापासून हे प्रमाण कित्येक हजार टनांपर्यंतदेखील कचरानियोजन करावे लागते. महानगरपालिकांचे कचऱ्याचे मोठमोठे डंपर या कचऱ्याची वाहतूक शहरातून करत तो डम्पिंग यार्डवर नेत असतात. तो कचरा मोठमोठे भाजीबाजार, मोठी उपहारगृहे, पंचतारांकित हॉटेले, मंगल कार्यालये आणि मोठी निवासी वसतिगृहे या ठिकाणांहून गोळा होत असतो. तिथे जर आपण वर्गीकरण सक्तीचे करून त्यातील जैविक कचऱ्याची मोठमोठ्या मिक्सरमधून स्लरी बनवली आणि ती स्लरी बंद टँकरमधून प्रक्रियाकेंद्रावर नेली तर प्रक्रिया जलद तर करता येईलच, शिवाय ती यशस्वी नक्की होईल. हे करत असताना, एक महत्त्वाचे पथ्य पाळावे लागेलं, ते म्हणजे जिथे हा मिक्सर लावायचा आहे, त्या ठिकाणी प्रति दिवशी फक्त अर्धा ते एक टन कचरा येईल. त्या ठिकाणी नगरपालिकेला एक सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या धर्तीवर छोटे केंद्र उभे करावे लागेल.

शहरातील विविध भागांमधून अशी जैविक कचऱ्याची स्लरी गोळा केली, तर क्षेत्रीय स्तरावर निसर्गऋण बायोगॅस प्रकल्प लावता येतील. आतापर्यंत अनेक ठिकाणी असे प्रकल्प लावण्यात आले. काही ठिकाणी विविध कारणांनी ते बंद पडले, काही ठिकाणी ते यशस्वीपणे सुरू आहेत. बंद पडण्याचे मुख्य कारण; या प्रकल्पांची जागा शोधताना ती शक्यतो वस्तीपासून दूर असायला हवी, तशी ती नव्हती. यात खरे तर अनेक मुद्दे आहेत. दुसऱ्या क्षेत्रातील कचरा आमच्या क्षेत्रात आणून त्यावर प्रक्रिया का करता, हा त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा असतो. आणि त्यात बरेचसे तथ्य आहे. एखाद्या ठिकाणी पाच टन क्षमतेचा प्रकल्प लावला, व तिथे वर्गीकरण न केलेला कचरा आला, तर प्रकल्प कर्मचाऱ्यांची त्या पाच टन कचऱ्याचे वर्गीकरण करताना दमछाक तर होतेच, पण त्याकाळात त्या परिसरात त्या कचऱ्याची दुर्गंधी पसरणे स्वाभाविक असते. रात्रभराच्या कचऱ्यात आपल्या घरातील बादलीला किती दुर्गंधी येते याचा अनुभव थोड्याफार फरकाने प्रत्येकालाच असतो, मग इथे जर टनावारी असा कचरा येत असेल तर त्याला दुर्गंधी येणारच! त्या दुर्गंधीचा त्या क्षेत्रातील रहिवाशांना त्रास होणे स्वाभाविक आहे. म्हणजे वर्गीकरण नाही म्हणून दुर्गंधी येणे, यासाठी नगरपालिका प्रशासन खरे तर जबाबदार नसते, पण प्रकल्प त्यांचा आहे म्हणून तो दोष त्यांच्या माथी येतो. त्यामुळे या प्रकल्पांच्या सुरुवातीपासूनच नियोजनातच प्रशासनाची खरी कसोटी असते. त्यामुळे यासाठी जागा शोधताना काही मार्गदर्शक तत्त्वे देता येतील का या दृष्टीने आपण विचार करू.

● नगरपालिकांच्या आणि महानगरपालिकांच्या क्षेत्रात बायोगॅस प्रकल्प हा शहरात लावायचा असेल तर एक ते दोन टन प्रतिदिन या क्षमतेपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प लावू नयेत. त्यापेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प लावण्यासाठी आहे त्या डम्पिंग यार्डचाच फक्त वापर करावा.

● एक ते दोन टनाच्या क्षमतेच्या प्रकल्पसाठी जी जागा ठरेल, त्या परिसरात प्रकल्प लावताना त्याला योग्य ते जैविक दुर्गंधी नियंत्रक बसवले जातील याची दक्षता घ्यावी.

● मंगल कार्यालयांसाठी आणि मोठ्या हॉटेलांमध्ये एक ते दोन टन क्षमतेचे प्रकल्प सक्तीचे केले तर त्यांचा कचरा उचलावा लागणार नाही.

● काही ठिकाणी सांडपाण्याची प्रक्रिया करण्यासाठी मोठमोठे प्रकल्प लावलेले असतात. त्या प्रकल्पांमध्ये मोकळी जागा भरपूर असते. त्या जागेचा वापर हे निसर्गऋण प्रकल्प लावण्यासाठी करता येईल.


● मोठमोठ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतींमध्ये भरपूर मोकळी जागा असते. अशा ठिकाणी त्या वसाहतीत गोळा होणाऱ्या जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी एक ते पाच टन क्षमतेचे प्रकल्प लावता येतील.

● खाजगी आणि औद्योगिक आस्थापनांमध्ये त्या त्या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी असे प्रकल्प लावणे शक्य आहे.

● शिक्षणसंस्थांमध्ये मोठमोठी वसतिगृहे असतात. ह्या वसतिगृहांमध्ये निर्माण होणाच्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी असे प्रकल्प बांधले तर नवीन पिढीला त्यांचे महत्त्व समजेल, व त्यातील बारकावे समजावून घेता येतील.

निसर्गऋणप्रकल्पात भाभा अणुशक्ती केंद्रात असताना जे तंत्र विकसित केले होते त्यात पारंपरिक आणि मूळ बायोगॅस प्रकल्पात बऱ्याच तांत्रिक सुधारणा केल्या होत्या. पारंपरिक बायोगॅस प्रकल्प हा फक्त शेणावर चालत असे. या तांत्रिक बदलांमुळे तो जैविक कचऱ्यावर चालू लागला. यात एअरोबिक म्हणजे हवेतील ऑक्सिजन वापरून पदार्थांचे अंशतः विघटन करून आणण्यासाठी प्रीडायजेस्टर लावला होता. त्यामुळे अंशतः विघटन होऊन पुढे अनएअरोबिक डायजेशन प्रक्रिया सोपी झाली. कचरा बारीक करण्यासाठी एक मिक्सर लावण्यात आला आहे. अनएअरोबिक डायजेस्टरमध्ये जो बायोगॅस निर्माण होतो, तो पुन्हा एकदा त्याच डायजेस्टरमध्ये फिरवण्याची सोय केली आहे. त्यामुळे या जैववायूची शुद्धता वाढते व त्यातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण कमी होते. तसेच, या एकूण प्रक्रियेस लागणार वेळ कमी होतो, त्यामुळे प्रकल्पाची एकूणच क्षमता वाढते. (चित्र पुढील पानावर)

त्या प्रकल्पावर सुरक्षा यंत्रणा ठेवण्याची जबाबदारी ही नगरपालिकेने घ्यायची आहे. ते प्रतिबंधित क्षेत्र आहे अशी सक्त ताकीद असली पाहिजे. ज्या नागरिकांना तो प्रकल्प पाहायचा आहे, त्यांच्यासाठी योग्य ती नियमावली बनवून तो दाखवण्याची तजवीज करायला हवी. प्रकल्पासाठी लागणारी वीज आणि पाणी पुरवण्याची जबाबदारी नगरपालिकेने स्वीकारली पाहिजे. प्रकल्प चालवण्यासाठी ज्या कचरावेचक संघटना पुढे येतील त्यांना योग्य तो मोबदला मिळेल आणि त्यासाठी असलेल्या सर्व सरकारी नियमांचे




पालन केले जाईल, ही जबाबदारी नगरपालिकेची राहील. मुंबई महानगरपालिकेच्या गोवंडी आणि देवनार येथील निसर्गऋणप्रकल्प चालवण्याचे कित्येक लाख रुपये स्त्रीमुक्तीसंघटनेला मिळालेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. देवनार येथील प्रकल्पाचे नूतनीकरण झाले आहे, तर गोवंडी येथील प्रकल्प शताब्दी इस्पितळाच्या नूतनीकरणामध्ये बंद केला आहे! आता ते पैसे त्यांना कोण देणार?

एक टन जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बांधलेल्या निसर्गऋणप्रकल्पासाठी साधारण चारशे चौरस फूट जागा लागते व साधारणपणे वीस लाख रुपये खर्च अपेक्षित असतो. त्यातून ६० ते १०० घनमीटर जैववायू दररोज निघू शकतो. वीस किलो मिथेन एवढा हा वायू असतो. त्यातून ५०-१०० किलोग्रॅम खत मिळू शकते. हा प्रकल्प चालवण्यासाठी दोन ते तीन कामगार लागतात. यातील वायुइंधन विकले गेले तर त्यातून प्रकल्प चालवण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा मोठा भाग मिळू शकतो. पण हा प्रकल्प म्हणजे जैववायू निर्माण करण्यासाठी लावलेला कारखाना नसून तो कचराप्रक्रिया प्रकल्प आहे, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अनुभव असा आहे, की वायुइंधन विकण्यात बरेच अडथळे येतात. त्यामुळे प्रकल्पातून आम्हाला काय मिळते, ह्या प्रश्नाला प्राधान्य मिळते. वास्तविक ह्या प्रकल्पातून कचऱ्यावर प्रक्रिया करून, आपण एकूणच मूलद्रव्यांची चक्रे व जीवचक्र संतुलित राहण्यासाठी वसुंधरेची मदत करत असतो. म्हणजे हा वसुंधरेचा जी.एस.टी. आहे, तो प्रत्येकाने भरणे आवश्यक आहे, हे लक्षात घेतले तर प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत. त्यातून निघणाऱ्या इंधनवायू आणि खताची योग्य ती किंमत वसूल करता आली तर जरूर करावी, पण ती किंमत काही कारणांमुळे वसूल होत नसेल, तर प्रकल्प बंद करण्यासाठी ते कारण ठरू नये. स्थानिक स्वराज्यसंस्था डम्पिंगसाठी जो खर्च करतात, त्यातूनही कचरा वाहून नेऊन डम्पिंगवर टाकण्याशिवाय काहीच मिळत नसते, ही वस्तुस्थिती आहे. हे जे अर्थकारण आहे, त्यात पर्यावरणाच्या अर्थकारणाचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकारे आणि केंद्र सरकार या सर्व पातळ्यांवर घनकचरा व्यवस्थापन करण्याचे नियम करत असताना हा विचार साकल्याने झाला पाहिजे. अनेक वेळा मी आणि माझ्या अनेक सहकाऱ्यांनी नियोजन आयोगापुढे (आताचा नीती आयोग), नगर विकास मंत्रालय आणि प्रदूषण नियंत्रण मंडळात हे विषय मांडले आहेत. ही सततची प्रक्रिया असते. ही प्रक्रिया चालू राहणे आवश्यक असते.

प्रकल्पातून निर्माण होणारा जैववायू पूर्णपणे वापरला जाईल याची दक्षता घ्यायला हवी. त्या वायूचा योग्य वापर करण्यासंबंधी पर्याय उपलब्ध नसेल तर तो जाळून टाकण्यासाठी सोय करावी. या वायूचा इंधन म्हणून चांगला उपयोग होऊ शकतो. जवळपास ते इंधन वापरू शकणारा कुणी हॉटेल किंवा उपाहारगृहमालक असेल तर त्याला तो वायू पाइपद्वारे पुरवण्याची सुविधा द्यावी. या वायूला योग्य त्या दाबाने पाठवण्यासाठी वायुसंप्रेरक किंवा तत्सम प्रणाली लावावी लागेल. त्या इंधनाचे मूल्य बाजारभावाने वसूल करता येईल. या वायूचे विद्युत ऊर्जेतदेखील रूपांतर करता येते. त्यासाठी जैववायूवर चालणारी संयंत्रे सहज उपलब्ध आहेत. ह्या विद्युत ऊर्जेचा वापर प्रकल्पाची विद्युत गरज भागवण्यासाठी तर होईलच, त्याशिवाय जी ऊर्जा वाचेल तिचा वापर परिसरातील दिव्यांना देण्यासाठी करता येईल. एल.ई.डी. दिव्यांमुळे विद्युत ऊर्जेची कमालीची बचत होते, त्यामुळे बरेच दिवे त्या परिसरात लावता येतील.

हा जैववायू मुख्यतः मिथेन असतो. मिथेनचे इंधनमूल्य हे एल.पी.जी. वायूच्या इंधनमूल्याइतकेच असते. परंतु जैववायूत शुद्ध मिथेन तयार न होता त्यात काही प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईडदेखील असतो. तो वेगळा करून मिथेन सिलिंडरमध्ये भरता येणे शक्य असते. त्यासाठी कमीत कमी १०००० घनमीटर जैववायू दररोज निर्माण होणार असेल तरच ते आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे प्रकरण असते. अन्यथा हा पांढरा हत्ती ठरेल. बऱ्याच ठिकाणी कंत्राटदार प्रकल्प समजून न घेता मोठमोठी आश्वासने नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांना देतात व पुढे ती पाळली जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. प्रकल्पाची छाननी नीट न करता असे कंत्राट दिले जाते, हेही प्रकल्प न चालण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे असे प्रकल्प लावण्यापूर्वी योग्य तो शास्त्रीय किंवा तांत्रिक मार्गदर्शन घेतले जाईल याची दक्षता घेणे महत्त्वाचे असते.

या ठिकाणी गोवा राज्यातील सालीगाव प्रकल्पाचे उदाहरण महत्त्वाचे आहे. गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. मनोहर पर्रीकर यांनी सन २०१५ मध्ये उत्तर आणि दक्षिण गोव्यासाठी दोन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प लावण्याचे ठरवले होते. ह्या प्रकल्पासाठी त्यांनी जे कंत्राटदार नेमले, त्यांना शास्त्रीय आणि तांत्रिक मदतीसाठी तज्ज्ञांची समिती नेमली. या समितीत काम करण्यासाठी त्यांनी मला बोलावले होते. सालीगाव येथील प्रकल्प २०१६ मध्ये कार्यान्वित झाला. सुरुवातीला १२५ टन कचरा हाताळणाऱ्या या प्रकल्पाच्या क्षमतेत वाढ करून तो आता दररोज २५० टन कचऱ्यावर प्रक्रिया करत आहे. त्यापैकी १५० टन जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यातून जो इंधनवायू निर्माण होतो, त्यापासून विद्युत ऊर्जा निर्माण केली जाते. प्रकल्पासाठी लागणारी विद्युत ऊर्जा वगळता बाकीची ऊर्जा गोवा विद्युत मंडळाकडे सोपवली जाते. कोरड्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यात जे रिफ्युज मिळते ते इंधन म्हणून जाळण्यासाठी






सिमेंट फॅक्टरीकडे पाठवले जाते. या प्रकल्पासाठी गोवा सरकार प्रक्रियामूल्य देत आहे, हे महत्त्वाचे! त्याशिवाय हा प्रकल्प चालणार नाही, हे डॉ. पर्रीकर यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या अभियंत्याच्या लक्षात आले होते. त्यांच्याकडे राजकीय इच्छाशक्ती तर मोठी होती. म्हणूनच हा प्रकल्प यशस्वी होऊ शकला व आजही तो व्यवस्थित चालू आहे. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे गोव्यातील त्या ठिकाणी जे डम्पिंग यार्ड होते, त्या ठिकाणी आता डम्पिंग यार्ड नाही! ह्या प्रकल्पातून कचरामुक्त गोवा ही कल्पना बऱ्याच अंशी यशस्वी झाली आहे.

सन २००८ साली माथेरान नगरपालिकेने भाभा अणुशक्ती केंद्राबरोबर सामंजस्यकरार करून पाच टन क्षमतेचा निसर्गऋणप्रकल्प बांधून सन २०११ मध्ये कार्यान्वित केला. त्या ठिकाणी भाऊ निपुरते नावाचे एक अधिकारी या प्रकल्पात मनापासून लक्ष घालत होते. त्यांनी हा प्रकल्प तिथे असेपर्यंत अतिशय कष्ट घेऊन यशस्वी करून दाखवला आणि माथेरान नगरपालिका क्षेत्र कचरामुक्त करून दाखवले. माथेरान प्रकल्पाला ISO ९००१-२००० हे प्रमाणपत्रदेखील मिळाले होते. एखाद्या नगरपालिकेला कचराप्रक्रिया केंद्रासाठी ISO प्रमाणपत्र मिळणे तसे दुर्मिळच! पण माथेरान नगरपालिकेने ही किमया करून दाखवली होती. कळमेश्वर, खोपोली, कराड यासारख्या छोट्या नगरपालिकांच्या हद्दीत अशाच काही गुणी अधिकाऱ्यांनी ही संकल्पना यशस्वी करून दाखवली आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेनेही यशस्वीपणे असे दोन प्रकल्प अनेक वर्षे चालवले आहेत.

बायो सी.एन.जी.चे प्रकल्प लावण्यासाठी वर म्हटल्याप्रमाणे कमीत कमी १०००० घनमीटर वायू असला पाहिजे, त्यासाठी किमान १०० टन क्षमतेचा प्रकल्प लावण्याची आवश्यकता असते. मुंबई, दिल्ली, कोलकाता यांसारख्या महानगरपालिकांमध्येच असे होणे शक्य असते. परंतु कचऱ्याचे अर्थकारण सामान्य माणसाच्या लक्षात येणे अवघड असते. राजकीय इच्छाशक्ती असेल तर काय होऊ शकते हे डॉ. मनोहर पर्रीकर यांनी त्यांच्या कार्यकाळात करून दाखवले आहे. प्रायोगिक तत्त्वावर सन २०१२ मध्ये असा एक दहा टन क्षमतेचा निसर्गऋण प्रकल्प त्र्यंबकेश्वरजवळ असलेल्या तळवडे गावात मिनिस्ट्री ऑफ न्यू अँड रिन्युएबल एनर्जी यांच्या मदतीने यशस्वी करून दाखवला आहे. त्यातील इंधनवायू २०० बार (bar) दाबाखाली सिलिंडरमध्ये भरून त्यावर नाशिकमधील आंतरराष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्वयंपाक बनवला जात होता. त्या प्रायोगिक प्रकल्पातूनच हे १०० टन क्षमतेच्या प्रकल्पाचे अर्थकारण फायदेशीर ठरू शकेल असे लक्षात आले होते.

एकूणच कचऱ्याचा प्रक्रियाप्रकल्प आणि त्या अनुषंगाने निसर्गऋण ही संकल्पना रूढ करण्यासाठी अथक मेहनत घ्यावी लागणार आहे. आपली निसर्गाशी असलेली बांधिलकी लक्षात घेऊन निदान आपण ज्या निसर्गातील गोष्टींचा आपल्यासाठी वापर करत आहोत, त्यांची योग्य त्या मार्गाने भरपाई करण्याची आवश्यकता आहे. आपण दरडोई दररोज दीडशे लिटर पाणी निसर्गाकडून घेत असलो तर तर त्यातील किमान निम्मे पाणी तरी निसर्गाला परत करायला हवे आहे. हीच तर असते निसर्गऋणाची भरपाई!

**– शरद काळे**
भ्रमणध्वनी : ७५०६४९८२८५
sharadkale@gmail.com

**चित्रगुज पश्चिमेचे**



**विजयराज बोधनकर**

# ऊर्जावान कलावंत

**हायरोनीमस** बॉश, पीटर ब्रॉयगल द एल्डर आणि जियोव्हानी अँटोनियो कनाल यांचा कलाप्रवास आहे. अंतर्मनातून येणारी कुठलीही गोष्ट मनाला भिडते मग ती चिरकाल टिकते, त्या गोष्टीला न संपणारं वय प्राप्त होतं, अशाच गोष्टी या चित्रकारांच्या आहेत. काही चित्रकार मुळातच उपजत कला घेऊन येतात कारण जन्मत:च त्यांना जे जे बघायला, अनुभवायला मिळतं ते मग मनबुद्धीच्या कप्प्यात मुरत जातं आणि मुरलेलं हळूहळू कलेच्या रूपानं बाहेर येत जातं. निसर्गाची मुलतत्त्वं चिरंजीव आहेत. साद-प्रतिसाद हा तर निसर्गाचा नियमच आहे.

हायरोनीमस एका कलावंताच्या घरात जन्माला आला. पीटर या चित्रकारानं शेतकऱ्याचं जीवनकाम चितारलं आणि जियोव्हानी यानंही चित्रकाराच्याच घरात जन्म घेतल्यामुळे त्याच्याही मनबुद्धीतून घरचीच परंपरा कलेतून व्यक्त झाली. आयुष्याच्या वळणावर जे जे क्षण अनुभवायला मिळतात त्या त्या क्षणांमुळे कलाही त्या क्षणांच्या प्रभावासोबत चालत राहते. असे हे तीन चित्रकार भिन्नभिन्नतेच्या मार्गावरून चालते झाले. त्यांचा हा थोडक्यात कलाप्रवास..



हायरोनीमस बॉश यांची कलाकृती



### हायरोनीमस बॉश

फक्त सौंदर्य आणि रंग व संवेदनशीलता आणि जाणिवेचं सौंदर्य यात मोठी तफावत असते. मनाला वैचारिक उंची प्राप्त झाली की कलावंत पुन्हा सत्याचा शोध घेतो आणि मग कलेतून उत्तराचं सौंदर्य प्रकट करतो. हायरोनीमस बॉश हा एक तठस्थपणे शोध घेऊन चित्रकारिता करायचा. त्यामुळेच त्याच्या चित्रातली भाषा वेगळा विचार करायला भाग पाडायची. हा एक पारंपरिक कलावंत होता. त्याचे आजोबा जॅनव्हॅन आकेन हेसुद्धा चित्राकारच होते. त्यांना एकूण पाच मुले होती. त्यापैकी चार मुलं चित्रकार झाली. हायरोनीमसचे वडिल एक कलात्मक सल्लागार होते. त्यामुळे त्यांच्या काकांनी व वडिलांनी त्याला चित्रकलेचे धडे शिकवले. असा हा चित्रकार १४५० साली डच प्रांतातल्या ब्रॅबटच्या राजधानीच्या हर्टोजणबॉशजवळ झाला आणि पूर्ण आयुष्य त्यानं इथंच व्यतीत केलं.

१४८८ मध्ये एका पुराणमतवादी धार्मिक गटाचा

तो सदस्य बनला, ज्यात हर्टोजणबॉशच्या चाळीस प्रभावशाली नागरिकांचा या विचारवंत गटात सहभाग होता व सातशे सदस्य युरोपभरातून सामील झाले होते. अशा विचारवंत संस्थेच्या प्रभावशाली विचारांचा पगडा हायरोनीमसवर पडला. याच काळात त्यानं वयानं मोठ्या असलेल्या बाईशी लग्न केलं. लग्नानंतर ते ओशॉर या गावात राहायला गेले. ती श्रीमंत घरकुलातून असल्यामुळे घर व जमीन तिनं आपल्या ताब्यात घेतली.

त्याच्या कलाकालखंडाचे तीन भाग पाडले गेलेत. प्रारंभीचं काम, मध्यमवयीन काम व शेवटच्या टप्प्यातलं काम. स्टीफन फिशर या शोधकर्त्याच्या माहितीनुसार त्यानं त्याच्या उशिराच्या कालावधीत तेरा पूर्ण कलाकृती व सात पेंटिंगमधल्या काळात पूर्ण केल्याचं लक्षात आलं (ठोस असे माहितीचे पुरावे नसल्यामुळे) प्रारंभीचा काळात त्यानं स्वत:च्या कार्यशाळेत रेखाटनांचा भरपूर अभ्यास केला. तो अनेक विद्यार्थ्यांना तयार करत राहिला. तो गुळगुळीत चित्रं रंगवायचा, स्केचिंग करून पारंपरिक फ्लेमिश शैलीनं तो काम करायचा. जो जगाकडे अत्यंत गंभीर नजरेनं पाहायचा. तो वैचारिक विरोधाभासाची चेष्टासुद्धा करायचा. १४७५ ते १४८०च्या काळात त्यानं चितारलेलं 'द क्युअर ऑफ फॉली' या पेंटिंगमध्ये जगाची दिशाभूल करणाऱ्या वैद्यकिय पद्धतीची त्याने टिंगल केली. तो विचारप्रतिभांचा वापर करून एकसंघ प्रतिमा निर्माण करायचा. शेकडो सूक्ष्म घटक, वस्तू, मानवाकृती, निसर्ग अशा अनेकत्वाचा वापर करून गडद रंगातून तो चित्र निर्माण करायचा. अनेक आशयांचा कोलाज करताना त्याचं चित्र पाहणं एक प्रकारची परीक्षाच असायची.

स्पेन किंग फिलीप दुसरा हा हायरोनीमसच्या चित्रांचा कलेक्टर बनला होता. 'द गार्डन ऑफ द अर्थली डिलाईट' हे पेंटिंग राजानं त्याच्या बेडरूममध्ये यासाठी लावलं होतं, की सम्राटनंसुद्धा सदाचाराच्या मार्गावरूनच चालत राहावं. अशा या प्रभावशाली चित्रकाराचा मृत्यू १५१६ मध्ये हर्टोजणबॉश मध्येच झाला.



पीटर ब्रॉयगल द एल्डर यांची कलाकृती

**पीटर ब्रॉयगल द एल्डर**



विनोद आणि वास्तव, याचा उत्तम मेळ चित्रातून निर्माण करताना त्यानं शेतकरीवर्गाचं आयुष्य चितारलं, प्रत्येक क्षेत्रातल्या कष्टकऱ्यांचेसुद्धा रीतिरिवाज असतात. त्याचा संपूर्ण अभ्यास करूनच कलाकृती निर्माण करताना पीटर ब्रॉयगल द एल्डर या चित्रकारानं शेतकऱ्यांचं जीवनमान, गावातील शेतीमय हालचाली, शेतीतले कामकऱ्यांचं दृश्य, खूप साऱ्या लहानसहान काम करणाऱ्या व्यक्ती चित्रांतून पाहताना मन शेतातल्या कंपनांनी भरून येतं. पीटरनं याच कामावर फक्त लक्ष न देता धार्मिक, बायबलमधील चित्रं ही चितारली. असा हा चित्रकार १५२५च्या आसपास जन्माला आला. कुणी म्हणतं नेदरलँडमधल्या ब्रीडा शहरात जन्माला असावा तर कुणाच्या मते त्याचा जन्म ब्रायगलमध्ये झाला असावा.

प्रथम पीटरनं कोरीव डिझायनरची कामं केली. तो फ्लेमिश चित्रकार होता. त्यांच्या कुटुंबातले बरेचसे सदस्य चित्रकारच होते. पीटर ब्रायगलनं आपलं चित्रशिक्षण चित्रकार पीटर व्हॅन एलस्ट यांच्याकडे घेतलं. पाच वर्षांचा काळ व्यतीत केल्यानंतर १५५१ मध्ये पीटर बालटंज याला एक वेदी चित्रासाठी सहकार्य केलं. त्यानंतर १५६३ त्याने मेकेन पीटर एल्स या युवतीशी लग्न केले. तिला सात भावंडं होती, जी सर्वच्या सर्व चित्रकारच होती. काही काळानंतर पीटर इटलीला रवाना झाला. तिथला चित्राभ्यास केल्यानंतर फ्रान्स व रोमलासुद्धा पोचला तिथून पुन्हा रोमला आला. तिथे मात्र लघुशैली चित्रकार ज्युलिओ क्लोविओशी भेट झाली. दोघं मिळून निसर्गचित्राचा आस्वाद घेतात, चित्रनिर्मिती करतात. तिथेच त्याचा लघुशैलीसारख्या धाटणीचे भरपूर चित्रसराव झाला.

इटली त्यानंतर एंटवर्प इथेही त्याला जाऊन चित्रजगताचा अभ्यास केला. तिथल्या हायरोनीमस कॉक यानं त्याच्या चाळीस चित्रांचा संच मुद्रित केल्याची नोंद आहे. उत्तर युरोपातला सर्वात महत्त्वाचा प्रकाशक आणि मुद्रक म्हणून कॉककडे पाहिलं जायचं. त्यानंतर तो परतीच्या मार्गावर असताना ॲल्प्स डोंगरदऱ्यांचं चित्रण तो चित्रित राहिला. एटवर्प हे नेदरलँडमधलं वाणिज्य आणि कलेचं उत्तम मार्केट असल्यामुळे तो तिथे स्थायिक झाला, कारण त्याला अती श्रीमंतांकडून चित्रांची मागणी होत होती, त्याचे आश्रयदातेही वाढले होते. त्याला दोन मुलं व एक मुलगी होती.


दोन्ही मुलं पुढे उत्तम आर्टिस्ट बनली.

त्यानं त्याच्या चित्राला खूप जोशात रंगवलं आणि सामाजिक भावनेची जोड दिली. इतिहासातील सामाजिक काही तीव्र भावनांची पूर्ती त्यानं त्याच्या चित्रातून केली. १५६० नंतर मात्र थोड्या मोठ्या आकाराच्या आकृत्या काढून चित्रं पूर्ण करू लागला. प्रारंभीच्या त्याच्या चित्रात अगदी छोट्या-छोट्या अनेक मानवाकृती दिसत असायच्या. असा हा सामाजिक दृष्टिकोन ठेवणारा आणि समाजात रुळून त्यांच्या भावना समजून घेऊन चित्र साकारणारा चित्रकार ९ सप्टेंबर १५६९ रोजी स्वर्गवासी झाला.

**जियोव्हानी अँटोनियो कनाल**

अती प्रचंड ऊर्जा घेऊन जन्माला आलेली माणसं अत्यंत स्थिर वृत्तीची असल्यामुळेच कल्पनेपलीकडचं काम त्यांच्या मनबुद्धीच्या कक्षेतून होत गेलं. जे फक्त कॅमेऱ्यालाच करणं शक्य आहे ते काम सततराव्या शतकात जियोव्हानी अँटोनिया कनाल या महान चित्रकारानं करून दाखवलं. अनेक टोलेजंग इमारतींचा दृश्यभ्यास ज्यानं आपल्या कुंचल्यातून साक्षात करून दाखवला त्या जियोव्हानी अँटोनियो कनालाचा जन्म १६९७च्या १८ ऑक्टोबरला व्हेनिसला झाला. त्याचे वडील बर्नाडो कनाल हेसुद्धा पेंटर होते. त्याचा भाऊही चित्रकार असल्यामुळे जियोव्हानीने प्रारंभी या दोघांकडे चित्रांचं शिक्षण घेतलं. वडील त्या काळच्या नाटकांची दृश्यस्वरूप रंगमंचीय चित्रं साकारायचे. त्यांचा तो व्यवसायच होता.





जियोव्हानी अँटोनियो कनाल यांची कलाकृती

कुठल्या कुठल्या गोष्टीवरून व्यक्ती प्रभावित होत असते, तसा जियोव्हानी हा जियोव्हानी पॉलो पॅनिनीच्या कामानं प्रभावित झाला. जियोव्हानी कनालनं त्यानंतर शहर आणि तिथले दैनंदिन जीवनमान चित्रित करण्यास सुरुवात केली. काही काळ रोमला वास्तव्य केल्यानंतर त्यानं भौगोलिक स्वरूपाची त्रिनिर्मिती करायला सुरुवात केली. तो त्याच्या आवडीचा विषय बनत गेला. त्याचं भव्य पहिलं 'आर्किटेक्चरल कॅपरिचो' साकारलं. जे आजही एका खाजगी कलेक्शनमध्ये शाबूत आहे. वयस्कर चित्रकार लुका कार्ले विरीज हा एक एनग्रेव्हरसुद्धा होता. त्याच्याकडे जियोव्हानी बराच काळ चित्राभ्यास केला. तोसुद्धा शहरी जीवनवरचीच चित्रं साकारायचा. पण, लवकर जियोव्हानी आपल्या गुरूच्या कामाइतकंच सक्षम काम करू लागला. त्याला स्टेफेनो काँटीसारखा आर्ट कलेक्टर भेटला. ज्यानं जियोव्हानीच्या चित्रांचा अनेक ठिकाणी प्रसार केला.

कालांतरानं अचूकतेसाठी जियोव्हानी प्रख्यात होऊ लागला कारण शहरातल्या सूक्ष्मापासून भव्यतेपर्यंतच्या इमारती, गर्दी, अनेक शहरी घटक यांचे बारकावेसुद्धा जियोव्हानी कुशलतेनं चित्रित करू लागला. व्हेनिसमधल्या कालव्यांचे भव्य दृश्यभास त्यानं मोठ्या उत्कटतेनं चितारलं. वातावरणाचा वेगवेगळा प्रभाव व त्याच्या कामातून दिसू लागला. त्याच्या अनेक कलाकृती प्रदर्शनात व व्यापारी जोसेफ स्मिथ याच्या एजन्सीद्वारे विकल्या जाऊ लागल्या. १७४४ मध्ये जियोव्हानीला व्हेनिसमध्ये ब्रिटिश काऊन्सलसाठी नियुक्त करण्यात आलं होतं.

परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे १७४६ तो लंडनला परतला. तिथे त्यानं आश्रयदात्यांचे महाल आणि घरं चित्रित केली. हा व्यवसायिक भाग होता. बराच काळ लंडनला राहिल्यानंतर तो पुन्हा व्हेनिसला परतला. १७६३ मध्ये विनीशियन अकॅडमीमध्ये निवडून आला. काही निवांत, ऑन द स्पॉट रेखाटन करून त्याने आश्चर्यचकित करणारी चित्रनिर्मिती केली. त्याचे अनेक शिष्यगण तयार झालेत. त्याच्या बहुतेक कलाकृती ग्रेट ब्रिटनचा राजा जॉर्ज तिसरा याने विकत घेतल्यात. जियोव्हानीच्या पन्नास भव्य चित्रांचा व १४२ रेखाचित्रांचा त्यानं संग्रह केला. त्याचं चित्रं उच्च कोटीच्या किमतीला विकला गेलीत. असा हा चित्रकार १९ एप्रिल १७६८ रोजी व्हेनिसमध्येच मरण पावला.

**– विजयराज बोधनकर**


vijayrajbodhankar1964@gmail.com



**प्रकाश दुधळकर**

# सुनील कपाडिया

**कलात्मक** छायाचित्रण हाच ज्यांचा ध्यास आहे, असे सुनील कपाडिया एक कलंदर व्यक्तिमत्त्व. निरंतर साधना व कल्पकता यांच्या आधारे त्यांनी छायाचित्र किंवा फोटोग्राफीच्या कलेत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. कला कोणतीही असो, तुम्ही जोपर्यंत त्याचा सखोल अभ्यास करत नाही किंवा त्याच्या अंतरंगात शिरत नाही तोपर्यंत तुमच्या कलेचा प्रभाव इतरांवर पडणार नाही. चित्र हे पाहायचे नसते, ते अनुभवायचे असते. जोपर्यंत ही अनुभूती चित्र पाहणाऱ्यांना होत नाही तोपर्यंत त्या चित्राला काही दर्जा आहे असे म्हणता येणार नाही. सुनील कपाडिया यांचे फोटोग्राफ पाहणाऱ्याला ती अनुभूती देतात किंवा पाहणारा त्या चित्रांचा अनुभव घेत असतो. त्यातच सुनील कपाडिया यांचे वेगळेपण लक्षात येते. त्यांचे फोटोग्राफ बघताना नेहमीच जाणवते ते त्यांनी त्यात संपादन केलेले प्रावीण्य आणि त्यासाठी घेतलेली अपार मेहनत व राखलेले सातत्य. आपण त्यांचे फोटो बघतो तेव्हा ते फोटो आपल्यासोबत बोलू लागतात.




**सुनील कपाडिया**

सुनील कपाडिया यांच्याशी माझी ओळख सन १९९१ मध्ये द फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई येथे झाली. त्यावेळी मी या क्षेत्रात नवखाच होतो. मी माझी चित्रे त्यांना दाखवायचो त्या त्या वेळेस त्यांनी मला खूप प्रोत्साहन दिले. त्यांचे हमखास वाक्य म्हणजे, ये अच्छा तो है. अगर आप इसमे ये बाते ॲड करते, तो आपका फोटो और भी बेटर होता. ते कधीही चूक न दाखवता मलाच माझी चूक शोधून काढण्यासाठी प्रोत्साहित करायचे. एका चांगल्या शिक्षकाचे हे वैशिष्ट्य आहे. समोरच्याला नाउमेद न करता त्यालाच त्याची चूक ओळखायला लावणे आणि त्यासाठी मदत करणे व पुढे जाण्याचा रस्ता दाखवणे हे आहे. त्यांच्या प्रोत्साहन देणे याच गुणांच्या आधारे त्यांनी फोटोग्राफीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे व अनेकांना या क्षेत्रात येण्यास मदत केली आहे.

सुनील कपाडिया हे मूळच्या मुंबईच्या व्यापारी कुटुंबातून आलेले आहेत. त्यांचे वडील हायकोर्टात वकील होते. त्यांनाही फोटोग्राफीची आवड होती, त्यामुळे घरात एक बेलोज व्ह्यू फाइंडर कॅमेरा होता. त्यावर ते कुटुंबातील लोकांचे, घरातील कार्यक्रमांचे, सहलीचे फोटो काढत. त्यामुळे सुनील यांना लहानपणापासूनच कॅमेरा हाताळण्यास मिळाला. वडिलांप्रमाणेच तेदेखील घरातील लोकांचे, मित्रांचे तसेच सहलीतील सोबतच्या लोकांचे फोटो काढत. शिक्षणानंतर उपजीविकेचे साधन म्हणून त्यांनी टेक्स्टाइलशी संबंधित व्यवसायाची निवड केली. १९८० मध्ये त्यांना अमेरिकेत जाण्याचा योग आला. तिथे ते भरपूर फिरले. सोबत कॅमेरा होताच. त्यामुळे फोटोग्राफीदेखील भरपूर झाली. परंतु ते फोटो जसे आले त्यापेक्षा अधिक परिणामकारक येणे त्यांना अपेक्षित होते. त्यासाठी आपण फोटोग्राफीचे सखोल ज्ञान मिळवले पाहिजे असे त्यांना सारखे वाटत होते. फोटोग्राफ अधिक चांगले यावेत याकरता कुणाच्यातरी मार्गदर्शनाची गरज होती.

त्यांनी कॅमेरा क्लब ऑफ इंडिया या संस्थेचे सभासदत्व घेतले. ही संस्था श्रीकांत मलुष्टे, शाम मंचेकर, शरद देव्हारे हे निष्णात फोटोग्राफर चालवत होते. त्या सर्वांचे सुनील कपाडिया यांना मार्गदर्शन लाभले. त्यानंतर ते १९८३ साली फोटोग्रफिक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई, या संस्थेचे सभासद झाले. या संस्थेत त्यावेळी आर.ए. आचार्य, ॲस्पी पटेल, रोहिंटन मेहता, सायरस श्रॉफ व के.जी. महेश्वरी यांसारखी दिग्गज मंडळी कार्यरत होती. के.जी. महेश्वरी यांच्यासोबत तर त्यांचे कौटुंबिक जवळकीचे संबंध होते.



**Still Life: Devine Sublimation**

त्यांचेही त्यांना मार्गदर्शन मिळत गेले. संस्थेत असलेल्या लायब्ररीत फोटोग्राफीवरील बरीच पुस्तके होती. पुस्तके वाचूनही कपाडिया यांनी आपले ज्ञान वाढवले. पुस्तकातून मिळालेली माहिती व ज्येष्ठांकडून मिळालेल्या सूचना यांचा विचार करून स्वतःच स्वतःला शिकवण्याची वेगळी पद्धती त्यांनी विकसित केली. सतत प्रयोग करत राहणे व त्यातून स्वतः शिकत जाणे हा त्यांचा फोटोग्राफी शिकण्याचा मंत्र होता.

त्यांनी फोटोग्राफीच्या विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन ४००पेक्षा अधिक पुरस्कार मिळवले आहेत. त्यांनी फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडियाची एलपीएसआय (लायसनसिएट) ही उपाधी मिळवली; तसेच, फोटोग्राफिक सोसायटीने त्यांना ऑनर्स ही उपाधी दिली आहे. तसेच त्यांना फोटोग्राफिक सोसायटी ऑफ पुणे यांनी ऑनर्स पीएसपी आणि अमेरिट्स हा मानद सन्मान बहाल केला आहे. सुरुवातीला त्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सतत भाग घेऊन अनेक पुरस्कार मिळवले आहेत. पुढे त्यांनी स्पर्धांमध्ये भाग घेण्याचे बंद केले. ॲवार्ड फोटो किंवा ग्रेट फोटो ही समजूत चुकीची आहे असे त्यांचे मत आहे. चांगला फोटो तोच जो तुमचे लक्ष वेधून घेईल व कायम स्मरणात राहील. त्यांचा मुख्य भर कलात्मक फोटोग्राफीवर आहे. जिथे तुमच्या क्रियाशीलतेवर कोणत्याही मर्यादा नसतात. चांगल्यात चांगल्या निर्मितीसाठी संधी नेहमीच उपलब्ध असते, हा त्यांचा मंत्र आहे. त्यांचा असा विश्वास आहे, की तुमची स्टाईल ही तुमचीच असली पाहिजे, जी तुमच्या कामाचे वेगळेपण सांगेल व ती तुमच्या सहीप्रमाणे असेल. जे काम पूर्वी कुणी केले नाही व पुढेही कुणी करणार नाही असे एकमेव काम जे फक्त तुमचेच असेल.

फोटोग्राफी म्हणजे प्रकाशाच्या साहाय्याने चित्र काढणे. म्हणजेच फोटोग्राफीत सर्वात आधी प्रकाशाला महत्त्व आहे. फोटोग्राफी शिकणाऱ्या प्रत्येकाने आधी प्रकाश बघायला शिकले पाहिजे. कॅमेरा हे फक्त लाईट रेकॉर्ड करण्याचे साधन आहे. त्याला इतर काही कळत नाही. त्याला प्रकाश कमी किंवा जास्त आहे किंवा योग्य कोनात आहे किंवा कसे हे कळत नाही. जसा व जेवढा प्रकाश उपलब्ध असेल त्याप्रमाणे तो प्रतिमा तयार करतो. विचार तुम्हाला करायचा आहे व यासाठी प्रकाशाला जाणून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

फोटोग्राफीचे वेगवेगळे प्रकार आहेत. कोणताही प्रकार हाताळला तरी त्या प्रकारात तुमचे वेगळेपण दिसणे गरजेचे आहे. जसे की तुम्ही एखाद्या जाहिरातीसाठी आइसक्रीमचे फोटो काढत आहात. तो असाच हवा की पाहणाऱ्याला ते खायची इच्छा उत्पन्न होईल. जर तुम्ही लँडस्केप फोटोग्राफी करत असाल तर नक्कीच चांगल्या व योग्य ठिकाणी जाल. ठिकाण तर चांगले असतेच पण बदलणाऱ्या प्रकाशाप्रमाणे बदलत जाणारी परिणाम कारकता तुम्हाला टिपता आली तर त्या चित्राला अधिक महत्त्व प्राप्त होते.




**Nature: Sibling**




**Landscape : Miles to go before**

**Architecture: Timeless Arc**



सुनील कपाडिया यांनी त्यांच्या कामाची सुरुवात मुंबईपासून केली तरी काही वैयक्तिक कारणांमुळे त्यांनी पुणे येथे स्थायिक होण्याचे ठरवले. मुंबईप्रमाणे पुण्यालादेखील कलेचे वातावरण आहे. वेगवेगळ्या कलाशाखेतील अनेक कलाकार पुणे येथे स्थायिक झालेले आहेत. तसेच, पुणे हे मुंबईपासून जवळ व संपर्क साधण्यास सोयीचे असल्याने त्यांनी पुणे शहराची निवड केली. तिथे त्यांनी फोटोग्राफिक सोसायटी ऑफ पुणे या संस्थेची स्थापना केली व अनेक फोटोग्राफरना एकत्र आणले. त्यांनी आजपर्यंत एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे शिक्षण दिले आहे. अजूनही ते दर रविवारी फाईन आर्ट फोटोग्राफीशी संबंधित विविध विषयांवर चर्चासत्र चालवतात. निवडक फोटोंवर विचारविनिमय, फोटो मूल्यांकन करतात. तसेच, विविध कार्यशाळा; प्रदर्शने; व्याख्याने; डेमो, स्लाइडशो; फोटोग्राफीच्या सहली, गटसंवाद; इत्यादी उपक्रम चालू असतात.

छंद जोपासताना काही चांगले तसेच काही वाईट अनुभवही येत असतात. फोटोग्राफीसाठी प्रवास करताना एकदा चोराने त्यांचा कॅमेरा हिसकावून पळण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. तसेच, एकदा एक रानगवा त्यांच्या गाडीवर चाल करून आला, पण वाहनचालकाच्या प्रसंगावधानामुळे ते थोडक्यात बचावले. हे दोन प्रसंग वगळता त्यांच्या ४२ वर्षांच्या कार्यकाळात ९९ टक्के चांगले आणि आनंददायी अनुभव घेण्याचे भाग्य त्यांना लाभले.

फोटोग्राफीच्या क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्यांना त्यांचा हाच सल्ला असतो की फोटोग्राफी ही फक्त कॅमेरा आणि इतर वस्तू यांच्यापुरती मर्यादित नसून ती प्रकाशाशी संबंधित आहे. ज्याच्याद्वारे आपण वैशिष्ट्यपूर्ण फोटो घेऊ शकतो. फोटोग्राफीचा उगमच मुळी कॅमेरा नसून प्रकाश हाच आहे. वस्तू किंवा व्यक्ती केंद्रस्थानी न ठेवता डोळ्यांनी प्रकाशाची परिणामकारकता जोखता येण्याइतपत दृष्टीला सराव करायला हवा. कारण या प्रकाशाच्या अस्तित्वामुळेच कॅमेऱ्याला फोटो घेता येणे शक्य होते. नुसता कॅमेरा काहीच उपयोगाचा नाही.

**– प्रकाश दुधळकर**
माजी कोषाध्यक्ष, फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडिया
dudhalkar@gmail.com



डॉ. अनंत पां. लाभसेटवार

# बायडनची अत्यवस्थ शासनसत्ता

**जानेवारी** २०, २०२१ रोजी बायडन अध्यक्ष झाले. त्यावेळी डाव्यांच्या आशा पल्लवित झाल्या. अनेक वर्षांत प्रथमच सरकारची लोकसभा, उच्चगृह व अध्यक्षपद ही तीन सत्ताकेंद्रं डेमॉक्रॅटिक पक्षाच्या ताब्यात आली. सिनेटमध्ये मताधिक्य नसलं तरी उपाध्यक्ष कमला हॅरिस मत देऊन तराजू त्या पक्षाकडे झुकवू शकते. 'तुम्ही एक परिवर्तनवादी अध्यक्ष होऊन इतिहासात अमर होऊ शकाल.' असे काही डाव्या इतिहासकारांनी त्यांचे कान फुंकले आणि बायडन ढगावर चालू लागले. परंतु एका वर्षाच्या आत त्यांची प्रारब्धाशी गाठ पडून जी अधोगती झाली ती कुठल्याच अध्यक्षांच्या वाट्याला आली नाही. संसदीय राज्यप्रणालीत असं झालं तर सरकार पडतं व त्याची जागा दुसरं घेतं. पण अमेरिकेत अध्यक्षीय पद्धती आहे. तिच्यात चार वर्षांची सत्तामुदत राज्यघटनेनं बहाल केलेली असते. त्यानंतर ते पुन्हा पुढील चार वर्षांच्या मुदतीसाठी उभं राहू शकतात. पण शासनाची दयनीय स्थिती व देशाच्या प्रतिष्ठेला बसलेला डाग बघून त्यांच्या पक्षाच्या बुद्रुकांनीच म्हटलं की बायडनने या भानगडीत पडू नये. अगोदरच ते बुद्धिभ्रंशग्रस्त आहेत. त्यांना साधी सचिवांची (मंत्री) नावं आठवत नाहीत. लिहून दिलेलं ते टेलिप्रॉम्प्टरवर वाचतात व वेळ निभावून नेतात. आपण त्यांना निवडून महाभयंकर चूक केली याचं भान जनतेला होऊन ती प्रक्षुब्ध झाली आहे. त्यांचं शासन आता भीष्माप्रमाणे उत्तरायणाची वाट बघत आहे.


**घसरलेली लोकप्रियता**

कुठल्याही राजकारण्याचा प्राणवायू म्हणजे त्याची लोकप्रियता. बायडनला तिनं दगा दिला. जानेवारी २०२२ मध्ये त्यांच्या सत्तेचा पहिला वर्धापनदिन तोंडाशी आला तेव्हा जनतेनं त्यांच्याकडे पाठ फिरवली. क्विनीपियाक नावाच्या डावीकडे झुकणाऱ्या सर्वेक्षण संस्थेला त्यांची लोकप्रियता ३३% वर घसरली असं आढळून आलं. परंतु खोलवर बघितल्यावर चित्र अधिकच विदारक होतं. डेमॉक्रॅटिक पक्षाचे आधारस्तंभ म्हणजे कृष्णवर्णीय व हिसपॅनिक मतदार. त्यांच्या पाठिंब्याशिवाय ते अध्यक्षपद जिंकू शकत नाही. परंतु लॅटिन अमेरिकन लोकांत त्यांची लोकप्रियता फक्त २८% आढळली. कृष्णवर्णीयांमध्ये ती ५७% होती. ती साधारणपणे ९५% च्या आसपास असते. व्हाईट हाऊसमधे खऱ्या अध्यक्षाऐवजी त्याची मूर्ती ठेवली तर तिला जास्त मतं मिळतील अशी थट्टा केली गेली. पण बायडनच्या राजकीय शवपेटीत जानेवारी २०२२ च्या एका ४८ तासाच्या अवधीत दोन मोठे खिळे बसले. ते त्यांच्या भविष्याला घातक ठरेल.

**बंधनमुक्त निवडणूक**

पहिली वज्रमूठ म्हणजे त्यांच्याच पक्षाच्या दोन सिनेटरांनी (ख्रिस्टिन सिनेमा व ज्यो मँसिन) उच्चगृहाच्या नियमात बदल करण्यात दर्शवलेला विरोध. या गृहात वित्तसंबंधीत विधेयक सोडलं तर इतर ठराव समंत होण्यासाठी शंभरातील साठ मतं लागतात. नाही तर कुठलाही सिनेटर अहोरात्र उभं राहून निरर्थक भाषण ठोकून सिनेटचं काम ठप्प करू शकतो. म्हणून या गृहाला 'बडबड सभा' हे नाव जास्त शोभतं. या भाषणाला खीळ बसवण्यासाठी साठ मतं लागतात. याला फिलिबस्टर (Filibuster) तेवढी बायडनच्या पारड्यात नसल्यामुळे हा पारंपरिक नियम बदलून विधेयक साठऐवजी एकावन्न मतांनी समंत करता यावा यासाठी अध्यक्षांनी प्रयत्न सुरू केले.

असं करून त्यांना महत्त्वाचा हेतू साधायचा होता तो म्हणजे सध्या राज्यपातळीवर होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकांचं राष्ट्रीयीकरण करून ओळख पडताळणी न करता कुणालाही मतदान करण्याचा हक्क द्यावा. सध्या ओळखपत्र असल्याशिवाय मतदान करता येत नाही. २०२० च्या निवडणुकीत तसा नियम नव्हता. त्यामुळे झालेल्या गोंधळामुळे बायडन सत्तेवर आले. आजही ३६% अमेरिकन लोक व ७८% रिपब्लिकन मतदार बायडनने चोरून मतं मिळवलीत



बायडन

असं म्हणतात. निवडणुकीवरील विश्वासार्हता वाढवण्यासाठी अनेक राज्यांनी नियम कठोर केले व बायडनचा रोष ओढवला. ७०% अमेरिकन लोक व सर्वोच्च न्यायलायानं मतदान करण्यास ओळखपत्र असणं आवश्यक असावं अस मत व्यक्त केलं. तरीही बायडननी या जनमानसाविरुद्ध जाऊन कुणालाही मतदान करण्याचा अधिकार असावा असे ढोल पिटवले. तसं केलं नाही तर अमेरिकन लोकशाहीवर गदा पडेल अशी त्यांनी अतिशयोक्ती केली. पण, खरी गदा पडेल ती त्यांच्या पुनर्निवडणुकीवर. कृष्णवर्णीय लोक ओळखपत्र प्राप्त करण्यास असमर्थ आहेत म्हणून त्याचं सुलभीकरण करून त्यांच्याविरुद्ध होणारा अन्याय दूर केला पाहिजे हे उपाध्यक्ष कमला हॅरिसचं विधान हास्यास्पद वाटतं कारण ते तेवढे मतिमंद नक्कीच नाहीत. पण बायडननी असं आपल्याला लेखलं म्हणून ते नाखुश झाले हे मात्र नाही.

तर या दोन सिनेटरांनी फितूर होऊन बायडनचं विधेयक बुडवलं. हे त्यांच्या खूपच जिव्हारी लागलं व ते कमालीचे नैराश्यग्रस्त झाले. असं करणं ते आपल्या शासनाचं जीवितकर्तव्य समजतात.

**कोरोना लसीची सक्ती**

प्रत्येकानं लस घ्यावी या विषयी दुमत नाही. दुमत आहे ते अध्यक्षांना तिची सक्ती करण्याचा अधिकार आहे का याविषयी. अमेरिकन लोक आपलं वैयक्तिक स्वातंत्र्य जपण्यास नेहमी दक्ष व जागृत असतात. शासन त्यावर अतिक्रमण करणार नाही याची काळजी घेतात. त्यांच्या पक्षाच्या दोन सिनेटरांनी अव्हेरल्यानंतर ४८ तासांत सर्वोच्च न्यायालयानं त्यांचा वटहुकूम रद्द करून दुसरा दणका दिला. त्यांना आपला प्रभाव व शक्ती यांचा क्षय झाल्याचं भान झालं. या अपमानामुळे त्यांनी रुद्रावतार धारण केला. याप्रमाणे त्यांच्या मुख्य योजनांना कात्री लागल्यामुळे ते नपुंसक झाले. सिनेटमधल्या ३६ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे आपण विरोधी पक्षाशी हातजुळवणी करून राजकीय ध्रुवीकरण नष्ट करू या त्यांच्या आश्वासनातून हवाच निघून गेली व विश्वासार्हता लोप पावली. आता ५७% जनता त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल साशंक झाली. ७९% जनता देश चुकीच्या मार्गावर वाटचाल करत आहे असं म्हणते. इतिहासात एवढी दिशाभूल कधीच झाली नाही.

**अधोगतीची दुसरी कारणं**

याची यादी लांबलचक आहे. ती बायडनच्या निवडणूक नियम बदलण्यापेक्षा किंवा लसीची सक्ती करण्यापेक्षा लोकांना कितीतरी जवळची वाटते. ७०% लोकांना त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली भाववाढ, दक्षिण सरहद्द मोकळी केल्यामुळे वाढलेली घुसखोरी व गगनाला भिडलेलं गुन्हेगारीचं प्रमाण या प्रश्नांना कारणीभूत आहे, असं वाटतं. पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी बायडननी पहिल्याच दिवशी तेल व वायू उत्पादनावर बंधनं घातली. त्यामुळे रोजचं उत्पादन वीस लाख पिंप घटलं व इंधनदरात ४३% वृद्धी झाली. गोमांसापासून वाहननिर्मितीपर्यंत ऊर्जा लागत असल्यामुळे प्रत्येक जीवनोपयोगी वस्तूंचे दर वर गेले आणि एप्रिल २०२२ मध्ये महागाई ८.३% म्हणजे गेल्या ४० वर्षांत सर्वाधिक झाली. त्यावेळी भारतात ती ६.५% होती. चार तपांपूर्वी जिमी कार्टर अध्यक्ष होते. म्हणून लोक बायडनला कार्टर II म्हणून हिणवू लागले. म्हणजे त्यांचंच एका मुदतीचं प्रारब्ध त्यांना लाभणार. कार्टर पुनर्निवडणुकीत पराजित होऊन रोनाल्ड रेगन त्यांच्या जागी आले होते.

लोकांनी केलेली ही तुलना त्यांना शोभनीय वाटली नाही. कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ झाली, पण भाववाढीमुळे तिचं मूल्य लोप पावलं. त्यांची क्रयशक्ती वास्तवात २% घटली. या देशात सध्या सामान्य जनता कमालीची प्रक्षोभक झाली आहे. त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेनं दक्षिण ध्रुव गाठलं. माध्यमं त्यांना स्नेही व ट्रम्पला शत्रू मानत होती. तरीही त्यांची लोकप्रियता माजी अध्यक्षापेक्षा खाली घसरली हे त्यांच्या कर्तृत्व व नेतृत्व याविषयी बोलकं आहे. याचा परदेशी संबंधावर परिणाम झाला. बायडन २०२४ मध्ये पदच्युत होण्याची दाट शंका असल्यामुळे युरोपीय राष्ट्रं अमेरिकेनं सांगितल्याप्रमाणे दीर्घकालीन धोरण आखण्यास तयार नाहीत. ते अध्यक्षांच्या नेतृत्वाविषयी साशंक आहेत.

दक्षिण सरहद्द मोकळी केल्यामुळे देशात खुनशी, बलात्कार केलेले व अंमली पदार्थ चोरून आणणारे दहशतवादी प्रविष्ट झाले आहेत. २०२१ मध्ये एकूण २० लाखापेक्षा जास्त अकुशल व अल्पपठीत लोक देशात घुसले. बायडन नवीन भ्रमणध्वनी, रोख पैसे व कामाचा दाखला देऊन त्यांचं स्वागत करतात. पण एचवन-बीवाले मुदत संपली की हाकलून देण्यात येतात. उद्या मोदींनी पाकिस्तानची सरहद्द उघडली तर आपणास जसं वाटेल तसं अमेरिकन लोकांना वाटत आहे. देशाच्या अखंडत्वाचा कुठल्याही नागरिकांना अभिमान असतो. अवैध स्थलांतरितांना पकडल्यानं वंशभेद व्यक्त होतो या भ्रामक कल्पनेनं त्यांनी देशाची स्वायत्तता नष्ट केली. अमेरिकन लोकांना कोरोनाची लस घ्या नाहीतर नियमितपणे चाचणी करा असं म्हणणाऱ्या अध्यक्षांनी तो नियम या अवैध पाहुण्यांच्या बाबतीत धाब्यावर बसवला. त्यांच्यामधले २०-२५% कोरोनाबाधित आहेत असं आढळून आलं.

**युक्रेन युद्ध व परराष्ट्र धोरण**

या क्षेत्रात आपण तज्ज्ञ आहोत असं बायडन अशा फुशारक्या मारत. त्यामुळेच ओबामानं त्यांना उपाध्यक्षपदी निवडलं होतं, पण आता देशाचे नेते, काळ व समस्या बदलल्या व बायडनचं कौशल्य कालबाह्य झालं हे त्यांच्या परराष्ट्र धोरणावरून सिद्ध झालं. अफगाणिस्तानमधून ऑगस्ट २०२१च्या एका मध्यरात्रीला ऐंशी अब्ज डॉलरची शस्त्रं मागे ठेवून भित्र्या भागुबाईसारखं पळून जाताना अमेरिकेला आपल्याबरोबर रक्त सांडत असलेल्या फ्रान्स व ग्रेट ब्रिटनला आगाऊ सूचना देण्याचं भान राहिलं नाही. त्यामुळे ते देश कमालीचे नाखुश झाले. भारतानं त्या देशात शेकडो दशलक्ष डॉलरची पायाभूत सुविधा देऊन पठाणांचं जीवन सुखकर केलं होतं. पण भारताचं मत न विचारताच बायडननी दहशतवादी तालिबानच्या स्वाधीन सत्ता दिली आणि आपली गुंतवणूक तर गेलीच पण पाकिस्तानचा प्रभाव वाढला. कारण तालिबानचं व त्या मुस्लीम देशाचं सैख्य आहे. आता भारताला वाढत्या दहशतवादीक हल्ल्यांना तोंड द्यावं लागेल.

मध्यपूर्व तेलसंपन्न देशांशी बायडनचं भांडण आहे कारण इराणशी करार करून त्या देशाला बायडन अब्जावधी डॉलरची रोख देण्याच्या वाटाघाटी करत आहे. त्यामुळे इस्राएल तर नाखुश झालाच, पण सौदी अरेबिया व U.A.E.ही बिथरला. त्याचा राजपुत्र मोहमद सालमनननी पत्रकाराचा खून करवून घेतला म्हणून बायडननी राजनैतिक शिष्टाचाराचा भंग केला व सालमनचा रोष ओढवला. बायडननी त्याला तेलउत्पादन वाढवून भाववाढ कमी करण्यासाठी एकदा नव्हे तर अनेकदा फोन केले. ते राजपुत्रानं घेणं नाकारलं व तेलउत्पादनात वाढ न करण्याचा निर्णय घेतला. याप्रमाणे अमेरिकेच्या अध्यक्षांची नालस्ती झाली.

परंतु त्यांच्या धोरणांची जगाला झळ बसली ती युक्रेन युद्धापासून. ते पुतिननं सुरू केलं म्हणून सगळे त्याचेवर खडे फोडतात. परंतु त्यामागे सबळ व तार्किक कारण आहे. १९९१ मध्ये सोव्हिएट युनियनचं विघटन झालं तेव्हा त्या देशानं युक्रेनमधून एका अटीवर अण्वस्त्र घरी नेण्याचं कबूल केलं. ती अट म्हणजे अमेरिका पूर्वेकडे नाटोचा विस्तार करणार नाही. कारण रशियाला अमेरिकेची अण्वस्त्रं आपल्या हद्दीजवळ नको होती. हे समजण्यासारखं आहे. १९६२ मध्ये सोव्हिएट युनियननं अमेरिकेपासून नव्वद मैलांवर असलेल्या क्युबामध्ये अण्वस्त्रं घुसवली तेव्हा अमेरिकेला ती कुठे आवडली? जग काही दिवस अण्वस्त्रयुद्धाच्या उंभारण्यावर उभं होतं.

युक्रेननं तोंडी कबुलीचा भंग करून नाटोच्या सदस्यत्वासाठी कारवाई सुरू केली आणि त्यामुळे पुतिनला आकम्रण करणं भाग पडलं.

अमेरिकेनं पुतिनला डिवचल्या जाऊ नये म्हणून सुरुवातीला बचावात्मक शस्त्रं पुरवली, पण मग आक्रमक शस्त्रं पाठवली. चाळीस अब्ज डॉलरची नवीन मदत मान्य करण्यास प्रयत्न सुरू केले. त्या अगोदर आठ-दहा अब्ज डॉलरची मदत केली होती ती वेगळी. याशिवाय नाटो राष्ट्रांनी अर्धा अब्ज डॉलर शस्त्रं रवाना केली. त्यामुळे चिमुकला युक्रेन आधुनिक शस्त्रांनी गळ्यापर्यंत भरला आहे. इथे महत्त्वाचं म्हणजे बायडनननी राजनैतिक तोडगा काढण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं. अमेरिकेत तो महत्त्वाचा मुद्दा फारसा चर्चिला जात नाही. यावरून त्यांनी पुतिनला कायमचं दुर्बल करण्याचं ठरवलं अशी शंका येते. पण जगात सर्वाधिक अणुबॉम्ब व हायपर सॉनिक मिझाईल असलेल्या देशप्रमुखाचा नाश कसा होईल हे एक अगम्य गूढ आहे असंच म्हणावं लागेल.

यात दोन गंभीर धोके उद्‌भवतात. एक म्हणजे रूढार्थानं युक्रेन लोकशाहीवादी नाही. तो देश भ्रष्टाचारासाठी ओळखला जातो. त्यामुळे त्यातले किती डॉलर कारणी लागतील व किती राजकारण्यांच्या, उद्योजगांच्या खिशात पडतील हे सांगणं कठीण.

यापेक्षा मोठा धोका म्हणजे तिसऱ्या महायुद्धाची संभावना. चूक किंवा गैरसमज झाला तर अण्वयुद्ध सुरू होऊ शकतं. याविषयी रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गे लॅव्हरॉव्ह, रॉकेट फोर्सेसचा कमांडर डिमिट्री रोगोझिन व अमेरिकेच्या हेरगिरी संस्थेचा (CIA) संचालक बिल बर्न्स, या सर्वांनी म्हटलं की अण्वयुद्धाची शक्यता वाढली. तरीही बायडननी त्याचा गांभीर्याने विचार केला नाही. उलट युक्रेनला अतिगुप्त माहिती पुरवून रशियाची प्राणहानी वाढवली. अशा तणावग्रस्त परिस्थितीत युद्धाची ठिणगी पेटण्यास किती वेळ लागेल? खुद्द पुतिननं लघु अणुबॉम्ब (Strategic Nuclear Weapons) वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही असं म्हटलं. अशा बॉबचा स्फोट व हानी मर्यादित असते.

याप्रमाणे सगळी शक्ती, शस्त्रं व संसाधनं युक्रेनला पाठवल्यावर तैवानसाठी किती उरली हा मोठा प्रश्न आहे. क्सी विनपिंगनी ते बेट ताब्यात घेण्यासाठी म्यानातून तलवारी उपसल्यादेखील. म्हणून अमेरिका एकाच वेळी पृथ्वीच्या दोन टोकांवर युद्ध लढण्यास समर्थ आहे का याची बायडननी चर्चा करून जनतेला व जगाला विश्वासात घेतलं नाही.

**युद्धाची सांगता**

हा कलह मिटवण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. ते युद्ध वर्षभर किंवा जास्त काळ कोरियन युद्धाप्रमाणे (१९५० ते १९५३) चिघळत राहील व अमेरिका कंटाळून युक्रेनचा दुभंग करेल. निप्रो (Nipro) नदीच्या पूर्वेकडील भूखंड रशियाच्या प्रभाव वर्तुळात असलेल्या दोन स्वतंत्र देशांत विभागला जाईल. युक्रेनच्या अध्यक्षाला (Volodymyr Zelenskyy) पंगू देशात सत्ता गाजवावी लागेल. परंतु या तोडग्यात बायडननी तसूभरही रस दाखवला नाही. उलट अमेरिकन मातांना बेबी फॉर्म्युला अनुपलब्ध असताना एकूण पन्नास अब्ज डॉलरचं कर्ज काढून त्या देशाला अत्याधुनिक शस्त्रं व मानवतावादी मदत पाठवली.

या शस्त्रवापरामुळे यदाकदाचित युक्रेन रशियाची हकालपट्टी करण्यात यशस्वी झाला तर झिलिन्स्की पुतिनला युद्ध गुन्हेगार (War Criminal) म्हणून हेगच्या आंतरराष्ट्रीय कोर्टात ओढून अब्जावधी डॉलरची नुकसानभरपाई तर मागेलच, पण रशियाच्या अध्यक्षाला

आजन्म शिक्षा देण्याचा प्रयत्न करेल. अशी परिस्थिती उद्भवण्यापूर्वी पुतिन लघु अणुबॉम्ब (Tactical Nuclear Weapon) वापरून झिलिनस्कीला शरण जाण्यास भाग पाडण्याची शक्यता जास्त. ही संभावना त्यानं युद्ध सुरू करताना वर्तवलीदेखील होती. या बॉम्बचा स्फोट हिरोशिमावर टाकलेल्या बॉम्बएवढा (दहा किलोटन) असेल. असं झालं तर अमेरिका कसा प्रतिसाद द्यायचा या संभ्रमात पडेल. पण, अशी भीषण वेळ उभी ठाकण्यापूर्वी जगविनाश टाळण्यासाठी लागणारी राजनैतिक मुत्सद्देगिरी बायडन शासनाजवळ आहे का, हा प्रश्न आहे.

**भारत सुरक्षित**


असं महासंहारक युद्ध झालं तर अमेरिका, युरोप व रशिया एकमेकांना उद्ध्वस्त करतील हे उघड आहे. रशियाच्या एका सेनापतीनं म्हटलंदेखील की संपूर्ण पश्चिम युरोपचा निकाल लावण्यास अर्धा तासदेखील लागणार नाही. म्हणून वाटाघाटी करून तडजोड करणं जगाच्या दृष्टीनं आवश्यक आहे. त्यासाठी भारताचे मोदी, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मेक्रोन व तुर्कस्तानचे अध्यक्ष रिसेप इडॉगन यांनी प्रयत्न केले. परंतु त्यांची शिष्टाई निष्फळ ठरली. युद्धाच्या उन्मादात विवेक बुद्धीची राख होते असंच म्हणावं लागेल.

युक्रेन युद्धात मोदींनी जी तटस्थ भूमिका घेतली त्यातलं शहाणपण इथे दिसून येतं. जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून अमेरिकेला भारताचं सरसंधान करण्याची जरुरी नाही. तसंच सर्वात मोठा ग्राहक व मित्र म्हणून पुतिनला आपल्याला लक्ष्य करण्यात रस नसणार. त्यामुळे आपण सुरक्षित राहू असं वाटतं. परंतु अर्धं जग उद्ध्वस्त झालेल्या पृथ्वीवर राहावसं वाटेल का?

अमेरिका हा एक दुष्ट देश आहे असं चित्र अतिडाव्यांनी रंगवलं. अमेरिका एक उत्कृष्ट देश असून त्याचे सध्याचे अध्यक्ष नतद्रष्ट आहेत असं म्हणणं योग्य ठरेल.

**– अनंत पां. लाभसेटवार**
लेखक फर्स्ट नॅशनल बँक, युएसएचे
१४ वर्षे चेअरमन ऑफ बोर्ड होते.
anantlabh@gmail.com

ग्रंथाली




मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.

**कॅडेट नंबर ३४५०**


**कॅप्टन सचिन गोगटे**

कॅडेट नंबर ३४५० आणि कॅप्टन नंबर ४८२२ असलेले कॅप्टन सचिन गोगटे यांनी मर्चंट नेव्हीतल्या ४३ वर्षांच्या दीर्घ करिअरमध्ये जगभरातल्या १२० देशांमध्ये सुमारे २७२ बंदरांना भेटी दिल्या. त्यातल्या निवडक बंदरांचा अनुभव या पुस्तकात कथन केला आहे.


**कॅन्सर म्हणजे..**
**डोकं फिरलेल्या पेशी**

**डॉ. सतीश नाईक**
**डॉ. दुर्गा गाडगीळ**

कॅन्सर या आजारावर प्रबोधन करणाऱ्या, उपाय करणाऱ्या संस्थांची यादी पुस्तकाला परिपूर्णता देते. संग्रही असावे असे धीर देणारे पुस्तक सांगतेय डोकं फिरलेल्या पेशींची अर्थात कॅन्सरची कहाणी.




मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.




मूल्य १५० रु.
सवलतीत १०० रु.

**इण्डॉ-logical**

**डॉ. माधवी नरसाळे**

'इण्डॉलॉजिकल' हे पुस्तक म्हणजे वेळोवेळी भारतविद्येच्या विविध कंगोऱ्यांचा आढावा घेणारे लेखसंग्रह. यात संस्कृत, संस्कृती, मराठी संतसाहित्य ह्या विषयांचे परिपाक म्हणजे हे लेख आहेत.

**मराठी सातामुद्रापार**

**मेघना साने**

मेघना साने यांनी लिहिलेले हे पुस्तक मराठी भाषेच्या कालप्रवासात अतिशय महत्त्वाचे ठरते. साहित्य, शिक्षण व कला या क्षेत्रांत संस्मरणीय कामगिरी आणि महाराष्ट्रातील काही व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा परिचयही त्यांनी या पुस्तकातून करून दिला आहे.




मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.

## 'कविता समजून घेतली पाहिजे' – रंगनाथ पठारे

'कल्पित वास्तव निर्माण करणे हे कवितेचे कामच आहे अन् हे वास्तवच जर दुर्बोध वाटत असेल, तर मात्र कविताही दुर्बोधच वाटतील. त्यामुळेच कविता हा नुसता वाचण्याचा नव्हे, तर समजून घेण्याचा विषय आहे' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक रंगनाथ पठारे यांनी येथे केले.

मकरंद भारंबे लिखित 'स्वयंभू' या कवितासंग्रहाचे प्रकाशन नाशिक येथे ५ जून रोजी पठारे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कवी व नाटककार आशुतोष पोतदार व ग्रंथालीतर्फे प्रवीण शिंदे यावेळी प्रमुख पाहुणे होते. देवेन कापडणीस यांनी प्रास्ताविक केले.

पाठारे म्हणाले, की 'सर्वसाधारणपणे कवी हा आपलीच भाषा बोलत असतो. त्याच भाषेत व्यक्त होत असतो. मात्र, त्याचवेळी तो भाषेच्या अंतर्गत रचनेत स्वत:ची मुद्रा कोरून आपली अशी भाषा निर्माण करत असतो. असाच स्पष्ट प्रयत्न भारंबे यांनी या संग्रहाद्वारे त्यांच्याही नकळतपणे केलेला दिसून येतो. त्यांची कविता मराठी साहित्याला काहीतरी देणारी आहे.'




**स्वयंभू**
**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

तत्पूर्वी पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले. याच संग्रहातील 'पसायदान' या कवितेने सुरुवात करत त्यांनी अनेक कवितांचा आशय आपल्या अतिशय सूक्ष्म अवलोकनाच्या माध्यमातून उलगडून दाखवला. तर, कवी भारंबे यांनी 'जीवनात कवितेची गरज काय?' या सर्वसामान्यांना पडणाऱ्या प्रश्नाचे यथोचित विश्लेषण करताना, कविता माणसाला जगण्याचा अर्थ देते, हे पटवून दिले. प्रवीण शिंदे यांनी वाचक म्हणून मनोगत व्यक्त केले.

●


---

## 'औद्योगिक जगतात संशोधनवृत्ती अंगी असणे गरजेचे' – डॉ. प्रमोद चौधरी

तंत्रज्ञान आणि प्रश्नांचे स्वरूप सातत्याने बदलत असते.औद्योगिक जगतात काळाच्या बरोबरीने धावायचे असल्यास संशोधनवृत्ती अंगी असणे गरजेचे असते, असे मत प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी व्यक्त केले.

'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्यांची गोष्ट' या पुस्तकाचे प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांच्या हस्ते प्रकाशन झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात विषयाच्या खोलात जाऊन संयमित मांडणी करणे आवश्यक असते. मात्र, सध्या या अभ्यासूवृत्तीचा अभाव जाणवतो. व्यवस्थापनक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी 'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट' हे एक अभ्यासपूर्ण पुस्तक असून, या पुस्तकाचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा किंवा केस स्टडीमध्ये हे पुस्तक रूपांतरित होऊ शकते का, याचा विचार करायला हवा, अशी अपेक्षा प्राज इंडस्ट्रीचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी व्यक्त केली.




**युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट**
**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**


यावेळी बोलताना दीक्षित म्हणाले, कोणत्याही प्रश्नाला दोन बाजू असल्या, तरी तोडगा एकच असतो. हेच देव यांच्या यशाचे रहस्य आहे. वीज आयोगाच्या स्थापनेनंतर आयोगाची कार्यपद्धती कशी असेल, हे निश्चित करण्यामध्ये देव यांचा महत्त्वाचा वाटा होता. विजेची चोरी होते तेथे अधिक भारनियमन करण्याचा नियम त्यांनी केला. वीजदरवाढीसंदर्भात ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यामुळे वीजदरवाढीबाबत आंदोलन झाले नाही.

लेखक जयंत देव यांनी त्यांचा अनुभवपट यावेळी मनोगताद्वारे उलगडला. जयंत देव लिखित 'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्यांची गोष्ट' या पुस्तकातील निवडक भागाचे संज्ञा कुलकर्णी यांनी अभिवाचन केले. मिलिंद बावा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ग्रंथाली विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी संस्थेच्या कार्याची माहिती देत भविष्यकालीन योजनांची माहिती दिली.

●

## ‘रिक्त–विरक्त’कादंबरीचे प्रकाशन

‘ग्रंथालीप्रकाशन’नंप्रकाशितकेलेल्यासुप्रसिद्ध कवयित्री छाया कोरेगांवकर यांच्या ‘रिक्त–विरक्त’ या कादंबरीचा प्रकाशन समारंभ प्रख्यात कवयित्री प्रज्ञा पवार यांच्या अध्यक्षतेखाली, १४ जून २०२२ रोजी मुंबईच्या दादर–माटुंगा कल्चरल सेंटर इथे संपन्न झाला. सुप्रसिद्ध लेखक राजन खान, मुंबई विद्यापीठातीलमराठीच्याप्राध्यापिकाआणिलेखिका डॉ. श्यामल गरुड तसेच विद्रोही कवी प्रकाश नाईक हे मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते.




**रिक्त–विरक्त**
**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

राजन खान यांनी या कादंबरीच्या स्त्रीवादी पैलूंवर प्रकाश टाकला. प्रत्येक पुरुषाला आपल्या चुकांचा शोध घ्यायला लावणारी ही कादंबरी असल्याचे नमूद करून, त्यांनी या कादंबरीमध्ये वेबसीरिज किंवा चित्रपट बनवण्यासारखे सशक्त कथाबीज असल्याचे सांगितले. प्रकाश नाईक यांनी विस्तृतपणे यातील शक्तिस्थळांची ओळख करून दिली. स्त्री आणि पुरुष यांच्यातील लैंगिक संबंधांच्या पलीकडे जाऊन निखळ प्रेमाचा स्वीकार, हे कादंबरीचं सूत्र त्यांनी अधोरेखित केलं. डॉ. श्यामल गरुड यांनी या कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक आशयावर भर देत, भारतातील पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाची मांडणी केली. डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी अध्यक्षीय भाषणातून यातील अनेक पेच–गुंतागुंत–व्यक्तिरेखा उलगडून दाखवल्या. स्त्रीला स्वतःच्या लैंगिक जाणिवा व्यक्त करण्याची इथली समाजव्यवस्था परवानगी देत नाही. स्त्रियांच्या लेखनावरही बंधनं घातली जातात हे वास्तव मांडून, छाया कोरेगांवकर यांची कादंबरी रसरशीत जीवनाचं कसं दर्शन देते यावर उत्कट भाष्य केलं. मराठी कादंबरीच्या प्रवासातील ही एक सशक्त कादंबरी असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

लेखिका छाया कोरेगांवकर यांनी आपल्या मनोगतातून, यात आलेल्या व्यक्तिरेखा काल्पनिक नसून त्या आपल्याला जीवनाच्या प्रवासात भेटल्या असल्याचं नमूद केलं. यातील अनेकांनी आपल्याला त्रास दिला, पण आपण त्यांना माफ केलंय. त्यांच्यामुळे आपण ही साहित्यकृती लिहू शकलो त्यामुळे त्यांचे मी आभारच मानते, असं प्रांजळपणे कबूल केलं.


प्रा. वृषाली विनायक यांच्या सुंदर–नेटक्या सूत्रसंचालनाने या कार्यक्रमाचे देखणेपण वाढले. ‘ग्रंथाली’चे सुदेश हिंगलासपूरकर हेही मंचावर उपस्थित होते.

**– प्रा. आशालता कांबळे**

---

## ‘विवाहसंस्था : संकल्पना आणि संक्रमण’ व ‘हुंकारनाद’ या पुस्तकांचे प्रकाशन

शनिवार, २ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता ठाणे येथील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात अनुराधा नेरूरकर यांनी लिहिलेल्या या दोन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला सुप्रसिद्ध लेखक, कवी किरण येले आणि सिद्धहस्त लेखक, निसर्ग अभ्यासक मकरंद जोशी/उपस्थित होते. सुरुवातीला अन्य वक्ते म्हणून लेखिका अनुराधा नेरूरकर यांनी या पुस्तकांच्या लेखनामागील विचार मांडले. महेश खरे यांनी ग्रंथालीच्या विविध योजना व उपक्रमांविषयी माहिती दिली.







| विवाहसंस्था | हुंकारनाद |
|---|---|
| मूल्य २५० रु. | मूल्य १५० रु. |
| सवलतीत १५० रु. | सवलतीत १०० रु. |

किरण येले यांनी अतिशय विस्तृतपणे ‘विवाहसंस्था’ या पुस्तकाची समीक्षा व कौतुक केले. भारतीय समाजातील व आदिवासी संस्कृतीमधील विवाहाच्या विविध प्रथांबद्दल सांगून येले यांनी हे पुस्तक म्हणजे विवाहसंस्था या विषयावरील पुस्तकमालिकेतील पहिला भाग ठरेल असे म्हटले. मकरंद जोशी यांनी आपल्या भाषणात ’विवाहसंस्था’ या पुस्तकाच्या समग्रतेचे व लेखिकेच्या रंजक शैलीचे कौतुक केले. अशोक बागवे यांनी आपल्या मिष्कील शैलीतील भाषणाने प्रेक्षकांना खळखळून हसवले. सोशल मीडियावर घाईघाईने व्यक्त होणाऱ्या कवींच्या पार्श्वभूमीवर अनुराधा नेरूरकर यांची संयत कविता जास्त उजवी आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

को.म.सा.प. युवाशक्ती आणि ठाणे शाखेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवर व रसिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री कीर्ती पाटसकर यांनी केले.

●

## ‘जगण्याला बळ देते ती सर्वश्रेष्ठ कलाकृती’ – अविनाश धर्माधिकारी

वैश्विकतेची मूळ संकल्पना आपण जगाला दिली आहे. आता त्या वैश्विकतेच्या पातळीवर आपण सिद्ध होण्याची वेळ आली आहे. जगण्याच्या संघर्षमय वाटचालीत साहित्य आपला आधार होत असते. जी साहित्यकृती जगण्याला बळ देते ती सर्वश्रेष्ठ कलाकृती मानली पाहिजे, असे मत माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.




**कॅडेट नंबर ३४५०**

**मूल्य ४०० रु.**

**सवलतीत २५० रु.**

मर्चंट नेव्हीमध्ये साकारलेला कॅडेट ते कॅप्टन हा कर्तृत्वसंपन्न कार्यकाळ आणि या कालखंडात जहाजावर आणि जहाज नांगरल्यावर विविध देशांत आलेल्या थरारक अनुभवांची रोमहर्षक कहाणी असलेल्या कॅप्टन सचिन गोगटे लिखित आणि ग्रंथाली प्रकाशित ‘कॅडेट नंबर ३४५०’ या पुस्तकाचे प्रकाशन आज धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ग्रंथाली प्रकाशनाचे सुदेश हिंगलासपूरकर, पूर्णा धर्माधिकारी, अरुण जोशी, अलका गोगटे, मीना गोगटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अविनाश धर्माधिकारी म्हणाले, की तरुण घडवताना आता केवळ स्थानिक पातळीवर सजग असणारा तरुण घडवून चालणार नसून वैश्विक पातळीवर काय घडामोडी घडत आहेत, त्याची जाण बाळगणारा तरुण घडवावा लागणार आहे. हे विश्व एक जग झाले आहे हे जाणिवांच्या पातळीवर मान्य करून तरुणांवर काम करावे लागणार आहे. व्यसनांचे प्रचंड आकर्षण सभोवताली असून त्या व्यसनांच्या आहारी न जाता आपले करिअर आपण कसे उत्तम घडवू याकडे तरुणांनी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

लेखक कॅप्टन सचिन गोगटे आपल्या मनोगत म्हणाले, की मर्चंट नेव्हीमधील आयुष्य प्रचंड आव्हानांनी भरलेले असते. मर्चंट नेव्हीबद्दल समाजात अनेक समज-गैरसमज आहेत. व्यसनाधीनतेच्या बाबतीत त्यातील काही समज काही अंशी खरे आहेत, परंतु त्यास अपवाददेखील आहेत. मर्चंट नेव्हीमधील नोकरीच्या निमित्ताने समुद्रावरील अफाट जग मला अनुभवता आले. निसर्गापुढे मनुष्यप्राणी खूप छोटा जीव आहे, याची मला वेळोवेळी प्रचीती आली.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या उपक्रमांबाबत माहिती देत पुस्तक प्रकाशनामागची भूमिका विशद केली.

मंजिरी कर्वे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर अर्चना लेले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

●

## ‘ग्रंथाली प्रतिभांगण गप्पा’मध्ये सुप्रसिद्ध संशोधक व शास्त्रज्ञ डॉ. आशुतोष कोतवाल यांची मुलाखत

फ्रान्स-स्वित्झर्लंड सीमेवर असलेल्या सर्न या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या ‘लार्ज हायड्रोजन कोलायडर’ या महत्त्वपूर्ण प्रकल्पात मोलाची भूमिका निभावणारे व संशोधनाच्या जोडीनेच अमेरिकेतील ड्युक विद्यापीठात विद्यादानाचे काम करणारे डॉ. आशुतोष कोतवाल यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम गुरुवार, ३० जून २०२२ रोजी झाला. ग्रंथालीच्या वांद्रे येथील प्रतिभांगण या वास्तूमध्ये म राठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमात डॉ. कोतवाल यांना अ.पां. देशपांडे यांनी बोलते केले. जगभरातील शेकडो देशांतील ७०००हून अधिक शास्त्रज्ञ सहभागी असलेल्या या प्रकल्पामागची संकल्पना, त्यात होणारे संशोधन याविषयी डॉ. कोतवाल यांनी पडद्यावरील आकृत्यांच्या साहाय्याने सोप्या भाषेमध्ये माहिती दिली. मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठराज जोशी, अन्य पदाधिकारी, तसेच विविध क्षेत्रांतील निवडक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

●




**डॉ. आशुतोष कोतवाल यांच्याशी संवाद साधताना अ.पां. देशपांडे**

## ‘पुस्तकांच्या चित्रवाटा’चे प्रकाशन




**पुस्तकांच्या चित्रवाटा**
**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ४५० रु.**

ग्रंथाली प्रकाशित ‘पुस्तकांच्या चित्रवाटा’ या शिरीष घाटे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशनसोहळा ४ जून २०२२ रोजी सोलापूर येथील हिराचंद नेमचंद वाचनालय संकुलातील ॲम्फी थिएटरमध्ये संपन्न झाला. चोलामंडल निवासी ज्येष्ठ चित्रकार भगवान चव्हाण अध्यक्षस्थानी होते, तर पटकथा लेखक व अभिनेते गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते पुस्तकाचं प्रकाशन झालं. व्यासपीठावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मृणालिनी फडणवीस, प्रिसीजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, भाई छन्नुसिंग चंदेले ट्रस्टचे सचिव रवींद्र मोकाशी यांची उपस्थिती होती.

आपल्या प्रास्ताविकामध्ये रवींद्र मोकाशी यांनी या पुस्तकाच्या निमित्तानं निर्माण झालेल्या चित्रकला व साहित्याच्या एकत्रित वाटेला शुभेच्छा दिल्या. चंदेले ट्रस्टच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत आजवर अनेक कलाविष्कार शिरीष घाटे यांनी केल्याचं त्यांनी सांगितलं. साहित्याकडे नेणाऱ्या या चित्रवाटेला रसिकांनी दाद देण्याचं आवाहन केलं.

‘चित्रांचं प्रकटीकरण हे अमूर्त स्वरूपाचं असलं तरी अत्यंत अपवादात्मकपणे ज्येष्ठ चित्रकार शिरीष घाटे यांनी स्वच्छंद चित्रकलेच्या वारशातून चित्र आणि शब्दांचा केलेला हा मिलाफ या क्षेत्रातील नव्या प्रयोगाची नांदी आहे. चित्रकलेत नेहमीच ॲकेडेमिक व स्वच्छंदी चित्रकला हे प्रवाह असतात. सोलापूर जिल्ह्यातील एम.एफ. हुसेन हे असाच स्वच्छंदी कलेचा वारसा चालवणारे कलावंत होते. या स्वच्छंदी चित्रकारांनी नेहमीच चित्रकलेच्या बाबतीत तयार झालेल्या चौकटी मोडल्या आहेत. घाटे यांनी स्वच्छंदी चित्रांतून शब्दांशी पूल बांधत एक नवा प्रयोग मांडला आहे, जो कलेच्या क्षेत्रात नवा मापदंड स्थापित करणारा ठरतो. रझा यांनी आपल्या चित्रात ‘माँ, मैं आ रहा हूं।’ या शब्दांचा समावेश केला होता. त्याचप्रमाणे चित्रवाटा हे पुस्तक चित्रप्रतिभेचं शब्दांशी मिलाफ घडवणारं देणं आहे. शिरीष घाटे यांनी स्वत:मध्येच एक विद्यापीठ तयार केलं आहे.’ असं अभ्यासपूर्ण प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार भगवान चव्हाण यांनी अध्यक्षपदावरून बोलताना केलं.

अभिनेते गिरीश कुलकर्णी म्हणाले, ‘शब्द किंवा वाक्यातून एखाद्या गोष्टीचा अर्थबोध होत नाही पण त्याच्या पलीकडे जाऊन चित्रं, अर्थ व शब्दांचं नातं जोडण्याचं काम करतात. आज शिक्षणातून कला हरवत चालली आहे. भाषा व संवादाच्या अडचणी येतात, आकलन नीट न झाल्यानं काहीच समजत नाही. एकमेकांपासून दूर गेलेल्या, संवाद हरवलेल्यांना एकत्र आणण्याचं काम पुस्तकांच्या चित्रवाटांमधून केलं आहे. हे पुस्तक सगळ्या विद्यापीठांतील ग्रंथालयांतून अभ्यासण्यासाठी ठेवलं पाहिजे. आशयाचा अवकाशाशी नातं सांधणाऱ्या या प्रयोगाचं स्वागत केलं पाहिजे. हे नवं आहे. मुखपृष्ठाकडून साहित्य वाचनाकडे नेणारी ही चित्रवाट त्यांनी निर्माण केली आहे. काय पाहायचं हे या पुस्तकानं आम्हाला सांगितलं आहे.’

आपल्या मनोगतामध्ये शिरीष घाटे यांनी या लेखनाचा व पुस्तकाचा प्रवास उलगडून दाखवला. ते म्हणाले, ‘या पुस्तकाच्या निमित्तानं स्वत:च्या कामाकडे वळून पाहता आलं पण त्याचे व्यवस्थित दस्ताऐवजीकरण न केल्याची खंत व्यक्त केली. लेखकानं मांडलेल्या आशयाकडे वाचकाला घेऊन जाण्याचं काम मुखपृष्ठ करतं त्यामुळे हा आशय वेगवेगळ्या प्रयोगांमधून सिद्ध केला आहे. मुखपृष्ठ पाहून कोणी पुस्तक वाचनाकडे वळेल तर माझं चित्र यशस्वी झालं आहे असं मी समजेन. लेखक, प्रकाशक व ग्राहक यांच्या अभिरुचीला एकत्रितपणे गुंफणं तारेवरची कसरत आहे.’ याशिवाय ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय सुंदर ग्रंथनिर्मिती केल्याबद्दल त्यांचेही आभार मानले.

याशिवाय कुलगुरू मृणालिनी फडणवीस, डॉ. सुहासिनी शहा यांचीही समयोचित भाषणं झाली. माधव देशपांडे यांनी सूत्रसंचालन केलं.

●




**पूर्ण रंगीत छपाई... आर्ट पेपरवर...**
**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३५० रुपयांत**
**टपालखर्च ३० रुपये वेगळा**


# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**गुंफियेला शेला**

**संपदा जोगळेकर-कुलकर्णी, सोनाली लोहार, हर्षदा बोरकर, निर्मोही फडके**



**चित्रकृतींचा मोहक शब्दवेध**

*''यशाची इच्छा असणाऱ्याच्या घरात या महाभारताचा आदर्श असेल आणि जिथे मानवाचं यश, जय तिथे 'तू' असशीलच. 'जय' नावाचा हा भूतकाळी इतिहास भविष्यातही नव्या रूपात घडेल आणि लिहिला जाईल, तुझी अविनाशी भूमिका देहमुक्त, अनासक्त होऊनही संपलेली नाही. कारण संभवामि युगे युगे हे वचन दिलं आहे तुझ्या व्यक्तिरेखेनं, विसरलास?''*

साहित्यात नवनवीन प्रवाह येत आहेत, त्यामुळे साहित्याचे दालन समृद्ध होण्यास मदतच होत आहे. परंतु त्याचवेळी अनेक प्रयोगदेखील साहित्यात होत आहेत. हे प्रयोगासाठी प्रयोग नसून प्रतिभेला आव्हान देणारे प्रयोग असतील तर त्यांचे स्वागत नक्कीच होते, त्यांची दखलदेखील घेतली जाते. अर्थात त्यासाठी लेखकाची लेखनावरील निष्ठा आणि त्याच्या प्रतिमेवरील त्याचा विश्वासदेखील महत्त्वाचा असावा लागतो. तर हे प्रयोग यशस्वी होऊ शकतात, याचा प्रत्यय अलीकडील काळात प्रसिद्ध झालेल्या काही पुस्तकांनी आणि त्याच्या लेखकांनी सिद्ध केला आहे. त्यातले एक आहे, 'गुंफियेला शेला'.

'गुंफियेला शेला' हा लघुकथांचा एक संग्रह आहे, ज्यात मोजून अठ्ठेचाळीस कथा आहेत. एकपानी, दोनपानी कथांचा प्रयोग अनेक मान्यवर लेखकांनी केलेला आहे. ज्यात दुर्गाबाई, अरविंद गोखले यांचा समावेश आहे. तशा 'गुंफियेला शेला' यात एकपानी कथा आहेत. मग यात नवलाचे आणि प्रयोगाचे काय आहे, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्याचे उत्तर नक्कीच आहे ते या दोन शब्दात 'नवलाचे' आणि 'प्रयोगाचे'. कसे ते सांगतो.

एक तर या कथा एकपानी आहेत, पण त्यांना वाक्यांची मर्यादादेखील आहे. प्रत्येक कथा वीस वाक्यांत पूर्ण, म्हणजे ठरवलेल्या चौकटीत घट्ट बसवलेली. शब्दांची मर्यादा येते तेव्हा साहजिकच फाफटपसारा न करता नेमकेपणाने आशयापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करणे, याला पर्याय उरत नाही. तो प्रयत्न इथे कसोशीने कसोटीपूर्वक पाळला गेलेला दिसून येतो.

दुसरी आणि अत्यंत आव्हानात्मक कसोटी म्हणजे लेखनाची. समोर एक चित्र ठेवलेले आहे, त्या चित्रातील कथेचे बीज शोधून त्यावर कथा लिहायची आहे. समोर मॉडेल ठेवून त्याच्याकडे पाहून चित्रकाराने चित्र तयार करायचे, तशी. बरे, ही प्रायोगिकता एका लेखकाने केलेली नाही, तर यात सहभागी आहेत चार लेखिका. एकाच चित्रावरून चौघींनी आपापल्या दृष्टिकोनातून कथेला आकार द्यायचा आहे. म्हणजेच एक मॉडेल वेगवेगळ्या अंशातून जसे वेगवेगळे दिसेल, तशा या चौघींचा कथा वेगवेगळ्या. या हिशोबाने बारा चित्रांवरून अठ्ठेचाळीस कथा वाचकांसमोर आलेल्या आहेत. या वेगवेगळ्या धाग्यांतून साकारलेला, गुंफलेला शेला म्हणजेच 'गुंफियेला शेला'! आहे की नाही अभिनव, कौतुकास्पद नावीन्य असलेला दर्जेदार साहित्यिक प्रयोग!

या कथा वाचताना आणखी वैशिष्ट्य जाणवते ते हे, की कथानकात असलेली वैविध्यपूर्ण भाषा, तिचे लालित्य आणि विषयाला गवसणी घालण्यातला आवाका. कथाबीज कायम ठेवून पैलू पाडलेल्या हिऱ्यासारखी त्याची नजाकत कायम ठेवून आपल्या कौशल्याचेही पैलू फिके पडणार नाहीत याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतलेली आहे. याचे त्यांना जाणवलेले वेगळेपण लेखिकेच्या – निर्मोही फडके यांच्या शब्दात सांगायचे तर ते असे, 'चौकट' आणि 'स्त्री' (विशेषत: भारतीय स्त्री) ह्यांचं एक पारंपरिक समीकरण आहे, पण ह्या कथाप्रयोगाच्या माध्यमातून एका चौकटीतली कलात्मकता, दुसऱ्या चौकटीतून सर्जनात्मक रीतीनं उलगडत एका चौकटीतली कलात्मकता, दुसऱ्या चौकटीतून सर्जनात्मक रीतीनं उलगडत नेत नवनिर्मिती करणं हा अनुभव आम्हाला मिळत गेला.

'गुंफियेला शेला' या कथासंग्रहाचा आविष्कार खरोखरच तलम, नाजूक, घट्ट वीण आणि सुंदर कल्पनांनी साकार झालेला आहे. याची ही कल्पक कलाकुसर संपदा जोगळेकर-कुळकर्णी, सोनाली लोहार, हर्षदा बोरकर आणि निर्मोही फडके या प्रतिभेचे वरदान लाभलेल्या चार लेखिकांनी मनापासून, ठाम विश्वासाने आविष्कृत केलेली आहे. नाट्य, नृत्य, दिग्दर्शन, लेखन या कलांमध्ये निपुण असलेल्या, आपापल्या आणि अभ्यासाचा ठसाही या लेखनावर आलेला आहे. 'चार सख्य चोवीस'ची सुपीक कल्पना याच चौघींची होती. तिचेच सुंदर बहरात आलेले देखणे रूप म्हणजे 'गुंफियेला शेला'. प्रत्येक वाचकाने तो पांघरावा असा हा शेला आहे.


डॉ. आनंद नाडकर्णी, मनोविकासतज्ज्ञ यांनी त्यांच्या प्रस्तावनेत लेखिका आणि त्यांचे प्रयोगशील लेखन यांची मनापासून प्रशंसा केलेली आहे. अच्युत पालव, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुलेखनकार यांनीही या चित्रकृतीचा संवेदनक्षम मनाने घेतलेल्या शब्दवेधाला मनमोकळी दाद दिलेली आहे. ज्या चित्रांवरून शब्दफुलोरा साकारलेला आहे, त्या चित्रांची रेखाचित्रे पूजा रायबागी, आकाश चंद्रकांत पोतदार, चिन्मय जोशी यांनी काढलेली आहेत. मुखपृष्ठावरील उत्तम सजावट अतुल जोशी यांची आहे.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**



# ग्रंथपान

**विवाहसंस्था**
**संकल्पना आणि संक्रमण**
**अनुराधा नेरूरकर**




**नातं आणि प्रेम याचा संगम असलेले तीर्थक्षेत्र**

*''स्त्री-पुरुष संबंध हे परस्परपूरक असायला हवेत. ह्या संबंधाचा समतोल साधणे हेच कुटुंबसौख्याच्या यशाचे रहस्य आहे. समाधान, तृप्ती आणि प्रेम, आनंद ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि हेच विवाहाचे सुवर्णतत्त्व आहे. आणि जगातील सर्व धर्मांमध्ये ह्या सुवर्णतत्त्वाचे महत्त्व अधोरेखित झालेले आपल्याला आढळते.''*

'विवाहसंस्था संकल्पना आणि संक्रमण' हे एका स्वतंत्र विषयावरील पुस्तक आपल्या हाती आले आहे. विवाह हा एकच शब्द न वापरता 'विवाहसंस्था' असा व्यापक अर्थाचा हा शब्द योजलेला आहे. ज्याचा प्रवास रानटी, मुक्त, एकलकोंडेपासून सुरू झाला आणि अंतर्गत सुरक्षा, ऐक्य, नीतीमत्ता, मूल्ये, प्रस्तावना या बंधांनी गुंफलेल्या नागरी टप्प्याशी येऊन विसावला. यात केंद्रस्थानी असलेला एकच शब्द आहे, 'विवाह'. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी या शब्दाला ओलांडून जाणे कुणालाही शक्य झालेले नाही, होत नाही, होणारही नाही. भले तो वेगवेगळ्या रूपात असेल, त्याची बैठक त्या समाजाच्या, धर्माच्या अधिष्ठानानुसार वेगवेगळी असेल, परंतु संस्कार एकच आहे. विवाह दोन भिन्नलिंगी माणसांचे एका बंधनात एकत्र येणे, आयुष्यभरासाठी, यासाठी जो समाजमान्य विधी केला जातो.

विवाहाचे आठ प्रकार आहेत- ब्रह्म, दैव, अर्ष, प्रजापत्य, गांधर्व, असुर, राक्षस आणि पैशाच्च. विवाहाचे विधी सात आहेत. होम, पाणिग्रहण, लाजाहोम, अश्मारोहण, अग्निप्रदक्षिणा, सप्तपदी, ध्रुवदर्शन. हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन या तिन्ही धर्मात यांचे स्वरूप वेगवेगळे आहे तरी एक सत्य आहे आणि ते आहे, 'विवाह म्हणजे एक आनंदसोहळा'.

विवाह म्हटला की केवळ दोन भिन्नलिंगी माणसे एकत्र येतात, एवढेच इथे अपेक्षित नाही. दोन कुटुंबे, दोन नाती, दोन संस्कार आणि नीतीमूल्ये यांचा हा संगम असतो. विवाहाच्या सोबत येतात ती कर्तव्ये, जबाबदाऱ्या, अपेक्षा आणि बरेच काही. जे नेटाने, निष्ठेने, संयमाने त्यांना सामोरे जातात, त्याचे विवाह साठाउत्तरी सुफळसंपूर्ण होतात आणि ज्यांना हा भार पेलवत नाही, त्यांच्याविषयी न बोललेच बरे.

'विवाहसंस्था संकल्पना आणि संक्रमण' या विषयाला किती व्यापक स्वरूप आहे हे पुस्तक वाचल्यानंतर लक्षात येते. त्याची दोन विभागांत विभागणी केलेली आहे. पहिल्या भागात विवाह आणि वैवाहिक जीवन यात येणाऱ्या अनेक घटकांचा समावेश आहे. त्यांची एकेक टप्पा करत अशा दहा टप्प्यांत-प्रकरणांत विभागणी आहे. तर दुसरा विभाग हा सहजीवनातील विसंवाद आणि कायदेशीर बाजू यांची दखल घेतलेली आहे. विवाहसंस्था अस्तित्वात येण्याच्या पूर्वीपासून ते आज विवाहसंस्थेला तडे देण्याच्या पद्धतीपर्यंतचा तपशील या पुस्तकात आलेला आहे. सामाजिक रूढी, परंपरा, समाजमान्यता ह्या बाह्य घटकांचा विवाहसंस्थेवर किती परिणाम होतो, तो कसा होतो, यांचे विवेचन करताना 'हे पवित्र बंधन, तीर्थक्षेत्र आहे' या सकारात्मक संकल्पनेवर मुख्य भर असलेला दिसून येतो आणि त्याचीच आज अधिक गरज आहे. कुठल्याही विवाहसंस्थेचा मूळ हेतू, त्याचे एकत्रित उत्तम परिणाम यांना महत्त्व न देता आज जे नवीन लिव्ह इन रिलेशनशिपचे फॅड सुरू झाले आहे, त्यातला फोलपणा, समलिंगी विवाहातील फोलपणा कसा आहे याचीही सोदाहरण माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य असे, की यातील तपशील, विवेचन व उदाहरणे यांना संदर्भ आहेत. वैदिक धर्म, हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन धर्म, महाभारत, जगभर अस्तित्वात असलेल्या रूढी-परंपरा यांचा अभ्यास लेखिकेने केलेला आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांच्यापासून बेंजामिन स्पार्क, एलिस हॅवलॉक, जॉर्ज पी मरडॉक, जॉन बॉस्वेल यांच्यासारख्या तज्ज्ञांच्या विचारांचा, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेला आहे. ही नुसती संदर्भासाठी नावे नाहीत, त्यांची तत्त्वे विषयानुरूप लेखिकेने आपल्या अभ्यासाच्या पृष्ट्यर्थ जागोजागी दिलेली आहेत. यात केवळ माहितीचा भरणा नाही त्यात मानसशास्त्र आहे. हे मानसशास्त्र त्या त्या वेळच्या सामाजिक, आर्थिक, एकल-सामूहिक स्थितीची तत्त्वे विषद करतात. विवाहात 'स्त्री' असते, जी घरदार, आप्त, सर्वकाही मागे सोडून पतिगृह येते, त्यामागे असणारी मानसशास्त्रीय आणि सामाजिक तत्त्वे खूप खोलवर रुजलेली आहेत. त्यांचा तपशिलात धांडोळा घेतलेला आहे. त्यामुळे एक उत्तम संदर्भमूल्य असलेला ग्रंथ हाती आला आहे, असेच म्हणावे लागेल.

या पुस्तकाच्या लेखिका आहेत अनुराधा नेरूरकर. त्या उत्तम साहित्यिका आहेत. 'एक आभाळ', 'आनंदनिधान', 'सुहृदा', 'सलणारा सलाम', 'डॉ. रघुनाथ माशेलकर' अशी साहित्यसंपदा त्यांच्या नावावर असून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. चित्रपटांसाठी गीतलेखन केलेले असून 'मौनात बोलते रात', 'स्वामी अय्यप्पा', 'मन शब्दांचे' हे त्यांचे प्रकाशित अल्बम आहेत. त्यांच्या लेखनाची स्वतंत्र शैली असून तिचा प्रत्यय 'विवाहसंस्था' या पुस्तकातून येतो.


या पुस्तकाच्या आशयाला साजेसे मुखपृष्ठ चित्रकार सतीश भावसार यांनी सजवलेले आहे. डॉ. प्रदीप कर्णिक यांनी अतिशय अभ्यासू ब्लर्ब या पुस्तकासाठी लिहिलेला आहे.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**




# ग्रंथपान

**साईड इफेक्टस्**
**नीलम माणगावे**




**सावली प्रकाशासमोर उभी राहते तेव्हा...**

*''उभा फड पेटावा चहूअंगांनी आणि मधी एखादं जनावर सापडावं तशी गत झाल्यावानी वाटाय लागलं. कुणीकडं जावं? कुटं पळावं? सगळीकडनंच आग लागल्याली... काय करावं? कधी फोन न करणारं लांबचं पैपावणं फोन करून विचाराय लागलं, ''काय वं? ऐकलं ते खरंय का?''*

कुटुंब असो की गाव, एखाद्या घटनेची ठिणगी पडून तिने भडका घेतला तर त्याचे परिणाम काय होतील, हे सांगण्यासाठी कुठल्या ज्योतिषाची गरज नाही. मग ही घटना वैयक्तिक असो, सामाजिक असो अथवा सरकार–संस्कृती–सभ्यतेची असो, परिणाम अटळ आहे. प्रश्न परिणामाचा आहेच, परंतु त्याच्या मुळाशी असणाऱ्या घटकांचादेखील आहे. ते घटक आहेत, ठिणगी का पडली, कुणी पाडली आणि परिणामांना सामोरे जाणारे त्याला किती जबाबदार आहेत? ज्यांना ठिणगीशी काही संबंध नाही असेही होरपळले जातात, त्यांचा दोष काय? हे व यासारखे अनेक प्रश्न जोडलेले असू शकतात. त्यांची उत्तरेदेखील असू शकतात. गरज असते ती त्या प्रत्येक पायरीच्या मुळाशी जाण्याची.

'साईड इफेक्टस्' ही कादंबरी अशाच एका विषयाला गवसणी घालते. विषय कोमल तसा तीव्र, सर्वपरिचित तरीही अस्पर्शित. तो म्हणजे स्त्रियांनी पुरुषाप्रमाणे परक्या व्यक्तीशी विवाहबाह्य संबंध ठेवणे. आमची सभ्यता, संस्कार, समाज अशा संबंधांना 'अनैतिक' या सदरात नव्हे अंधारकोठडीत ढकलून मोकळा झाला आहे असे नव्हे तर कायद्यानेही त्याला 'गुन्हा' या व्याख्येत बसवलेले आहे, नैतिकतेला कवच बहाल केलेले आहे. या संबंधात असणाऱ्यांसाठी शिक्षेची तरतूद तर सर्वमान्य आहे. तो पुरुष असो की स्त्री. एखादेवेळेस सबळ पुराव्याअभावी प्रकरण कोर्टापर्यंत गेले तर, संबंधित व्यक्ती निर्दोष सुटण्याची शक्यता असते. परंतु कुटुंब, समाज त्याला शिक्षा दिल्याशिवाय राहात नाही. कुटुंब, समाज जी शिक्षा देते तिची कठोरता कोर्टाहून नक्कीच तीव्र असते. म्हणूनच प्रत्येकाकडून नैतिकतेची कास धरली जाते ती त्यामुळे.

या नैतिकतेच्या रेशमी तलम पडद्याआड कित्येक स्त्रियांचे अस्वस्थ हुंकार दाबले गेलेले आहेत त्यांचे काय? पुरुषांना अशा हुकारांवर फुंकर घालण्याची मखमली सोय समाजमान्य ठरते, ती स्त्रियांना उंबरठ्याच्या आत दडण्यात धन्यता मानते ती का? कारणे काही असोत, त्यांचे प्रमाण भलेही अल्प असेल, असे अस्वस्थ हुंकार नाहीत, असे म्हणता येणार नाही. त्याला कुणी आपल्यापरीने खिडकी उघडी करू पाहण्याचा प्रयत्न करत असेल तर... उत्तर सोपे नाही त्याला मान्यताही नाही. परंतु हा विषय आहे, विषयाचा, त्याला नाकारता येणार नाही.

लेखिका नीलम माणगावे यांनी हा विषय कादंबरीसाठी निवडला, या धाडसाचे खरेच कौतुक करायला हवे. स्त्रियांच्या या प्रश्नाकडे पाहताना त्याची सामाजिक जाणीव बोथट झालेली आहे, त्या बंडखोरी करताहेत अथवा समाजमूल्यांचा संस्कार फेकून द्या, अशीही त्यांची भूमिका नाही. उलट हा विषय समोर ठेवताना त्यांनी किती वेगवेगळ्या कोनांतून या विषयाकडे पाहिलेले आहे, याची कल्पना येण्यासाठी प्रथम ही कादंबरी वाचायला हवी.

थोर मानसशास्त्र फ्राइड माणसांच्या वागण्याविषयीची मते मांडतो तेव्हा माणसाच्या लैंगिक भावना–समस्या यांच्याकडे प्रथम निर्देश करतो. या लैंगिक भावनांचे दमन आणि शमन यावर माणसाचे वागणे अवलंबून असते, असे नमूद करतो. त्याची आठवण ही कादंबरी वाचताना होते. परंतु लेखिकेला तेवढेच सांगायचे नाही. यात येणारे अतिरेकी स्वरूप, स्वैरपणा चौकट मोडण्याची उच्छृंखलता कधीही हानिकारकच एवढेच नाहीतर त्यामुळे उद्ध्वस्त होणारे आयुष्य, कुटुंबाची वासलात आणि समाजात होणारी बदनामी यावर त्या नेमकेपणाने भर देतात. शीर्षक तेच स्पष्ट करते.

कादंबरीलेखनासाठी खास अशी शैलीची योजना केलेली आहे. कादंबरी स्त्रियांच्या संबंधात असल्याने सहभाग असलेल्या मंदा, सविता, चंद्रा, मंजुळा, प्रिया, प्रतिभा, वंदना या स्वतःच स्वतःची कथा सांगतात. आपापल्या अनुभवांतून कथानक पुढे घेऊन जातात, त्यामुळे एकाच विषयाला विविधांगी रूप बहाल झाले आहे. स्त्रियांची जशी पुरुषांना भुरळ पडते तशी स्त्रियांनाही पुरुषांची भुरळ पडते, हे प्रामाणिकपणे कबूल करताना आपला गैरवापर होत असेल तर त्या चवताळून पेटून उठू शकतात, हेही त्याच कृतीतून दाखवून देतात. समाजाच्या नजरेतून उतरलो तर काय अवस्था होते. त्यापायी कुठले टोकाचे पाऊल उचलायचे, याचाही त्या ठामपणे निर्णय घेतात. हे सारे लेखिकेने त्यांच्याच मुखातून वदवले आहे. त्यामुळे प्रत्येकीच्या अंतरंगापर्यंतचा माग काढता आलेला आहे. अनैतिक संबंधाचे परिणाम काय व कसे होतात याची स्पष्टता अंजन घालणारी आहे.

कादंबरीत कथानक वेगाने पुढे जाते तरी त्याला आशय शेवटपर्यंत एकसंघ राहावा, त्यातली उत्कंठा आणि उत्कटता कायम राहावी यासाठी प्रयत्नपूर्वक लेखन करावे लागते, ते तंत्र लेखिकेला वश आहे. जयरामची व्यक्तिरेखा समर्थपणे केंद्रस्थानी ठेवून कादंबरीची सुंदर गुंफण केली आहे. पुरुषांनी आळ अंगावर घेतला तरी पुरुषी मानसिकता सोडलेली नाही. हा धागा अतूट ठेवऱ्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. त्यांची लेखनशैली त्या त्या व्यक्तिरेखांना उठाव देणारी आहे. त्यासाठी खास त्यांच्या दैनंदिन बोलीभाषेचा चपखल वापर केलेला आहे. भावभावनांची गुंफण, वागण्या–बोलण्यातले वेगळेपण समरसतेने अनुभवाला येते.

नीलम माणगावे सिद्धहस्त लेखिका आहेत. त्यांनी प्रकारचे लेखन केलेली असून ६५ पुस्तके प्रकाशित आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रमात त्यांच्या साहित्याचा समावेश आहे. शासनपुरस्कार व अन्य प्रतिष्ठेचे अनेक पुरस्कार त्यांना लाभले आहेत.


सतीश भावसार यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य ३५० रुपये  सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

## युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट

**शिल्पा शिवलकर**




**स्वत:वर विश्वास असणाऱ्या प्रत्येकासाठीची प्रेरणादायी गोष्ट**

*''किर्लोस्कर कन्सल्टन्सी, टाटा कन्स्लटन्सी अशी बडी नावं या क्षेत्रात असताना मी तुम्हालाच या कामासाठी का नेमावं?''*

यावर देवांचे उत्तर होते, 'या बड्या कंपन्या कुण्या नवशिक्याला तुमच्या कंपनीचं कामकाज पाहायला पाठवतील. मी माल शॉप फ्लोअरपासून सर्व टप्प्यांवरच्या कामाची पाहणी स्वत:च करीन. शिवाय मी केलेल्या सूचना राबवण्याची जबाबदारीदेखील माझीच असेल.''

स्वत:च्या ज्ञानावर आणि क्षमतेवर विश्वास ज्यांच्या ठिकाणी असतो त्यांच्या यशाची परिणती खणखणीत नाण्यासारखी चोख असणारच. याचा प्रत्यय एन्रॉन प्रकरणात आला. ही कंपनी आणि ती निर्माण करणार असलेली वीज, त्यामुळे राज्य वीज मंडळाला आणि पर्यायाने राज्याला किती आणि कशी किंमत मोजावी लागणार आहे, भविष्यातला दिसणारा आर्थिक धोका किती भयानक असणार आहे याचे अचूक निदान ज्यांनी अगदी सुरुवातीलाच मांडले, त्यांचे नाव आहे जयंत देव. पुढे राजकारण आणि विरोधक रस्त्यावर उतरले, त्यांच्या हातात जे विरोधाचे शस्त्र होते त्याचे निर्माते होते जयंत देव!

कुठलाही व्यवहार उद्योग–कामगार संघटना – त्यांच्या मुळाशी असणारे गणित अचूकपणे कसे सोडवता येईल, याचे सूत्र पक्के करण्यासाठी खूप अभ्यासाची गरज असते. बॉयलरपासून पॅकिंग झालेल्या उत्पादनपर्यंतच्या कामकाजाची, व्यवस्थापनाची सखोल माहिती गाठीशी असावी लागते. तरच त्याचे योग्य उत्तर सोडवता येते. अशी उत्तरे सोडवून अनेक उद्योगांचा, व्यवस्थापनांचा, निर्मितीचा रुतू पाहणारा रथ ज्यांच्यामुळे योग्य त्या मार्गावर अतिवेगाने धावू लागला, ते सारथ्य होते जयंत देव यांचे.

वीजक्षेत्राचाच नव्हे तर अनेक क्षेत्रे हे जयंत देव यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या परिघाबाहेरची होती, तरी ती सर्व क्षेत्रे आपल्या गवसणीत आणण्याचे कसब त्यांनी दाखवलेले आहे. त्यामुळेच वीजक्षेत्र, बीएएसएफ, बायर, किर्लोस्कर, वालचंद, घाटगे पाटील, कोलकाता मेट्रो, कोयना, खाडीपूल, उपनगरी रेल्वे, एसटी, ऑटोरिक्षा अशा अनेक प्रतिष्ठित बहुराष्ट्रीय कंपन्या ते वापरातले सगळ्यात सोयीचे सोपे वाहन, यांच्यातले गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्याचे कौशल्य जयंत देव यांनी दाखवलेले आहे.

जयंत देव यांची 'देव अँड असोसिएट्स' ही सल्ला देणारी कंपनी स्थापन झाली १९७९ साली. आजपर्यंत ही कंपनी यशाची अनेक शिखरे यशस्वीपणे पादाक्रांत करत वाटचाल करत आहे. ही यशोगाथा आपल्याला वाचायला मिळते ती 'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट' या चरित्रात्मक ग्रंथातून. जयंत देव यांचे हे यश काही कुणाच्या पाठिंब्याने वा घरातील परंपरेने आलेले नाही. त्यांची जिद्द, परिश्रम, अभ्यास आणि स्वत:वरील दमदार विश्वास या भांडवलावर ही कंपनी यशस्वी झालेली आहे. कुठलेही क्षेत्र वर्ज्य वा त्यासाठी असमर्थता न मानता प्रत्येकाच्या मुळाशी जाऊन आपल्या बुद्धिमत्तेची जणू कसोटीच पाहिलेली दिसून येते. प्रत्यक्षात पाण्यात उतरणे, तव्याचे चटके सहन करणे, यांचा आव्हान म्हणून स्वीकार केला. आव्हानच म्हणायचे तर या कंपनीच्या स्थापनेत आहे. हेवी इंजिनीयरिंग कॉर्पोरेशन, दुर्गापूर, एसीसी बॅबकॉक दुर्गापूर, भारत बिजली, ब्रिटानिया इत्यादी ठिकाणी काम करताना स्वत:ला तपासून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. या सर्व नोकऱ्या जयंत देव यांना स्थैर्य, पैसा आणि ऐषोआराम प्रदान करण्यास सक्षम होत्या. परंतु त्या नोकरीवर पाणी सोडून 'सल्ला देणारी कंपनी' स्थापण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला, तेही समोर हातात कुठलेही काम नसताना. स्वत:चा दुर्दम्य विश्वास म्हणतात तो हा. सुप्रसिद्ध लेखक आणि अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ यांना ग्राहक पंचायत सक्षमपणे यशस्वी करण्यासाठी खरी मदत झाली ती जयंत देव यांचीच, अनेक मान्यवरांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. कधी कधी अपमान सहन करण्याची वेळ आली, तरी समोरच्या पार्टीलाही त्यातून सुटका मिळालेली नाही. नवल टाटासारख्या उद्योगपतीला, नियामक आयोगाला, सरकारलादेखील माघार घ्यावी लागली ती जयंत देव यांच्यामुळे. एन्रॉनचा प्रकल्प कसा धोकादायक आहे यासाठी त्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना छत्रपती शिवाजीमहाराज यांचे अमात्य रामचंद्र पंत यांच्या आज्ञापत्रातील मजकूर वाचून दाखवला, हा केवळा इशारा नव्हता तर जयंत देव व्यासंगाचा सज्जड पुरावा होता असेच म्हणावे लागेल.

जयंत देव हे मेकॅनिकल इंजिनीयर आहेत. मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम आलेले आलेले आहेत तर मेकॅनिकच्या परीक्षेत याच विद्यापीठात दुसरे आलेले आहेत. 'युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट' यातील सर्व प्रवास थक्क करणारा आहे. प्रत्येक टप्प्यावर घडलेल्या घटना, प्रसंग, त्यावरील निर्णय वाचत असताना आपण दिङ्मूढ होतो आणि कौतुकाने फुलूनही येतो. ज्यांना आपल्या आयुष्यात यशस्वी व्हायचे आहे आणि स्वत:वर ज्यांना पूर्ण विश्वास आहे. त्यांच्यासाठी प्रेरणा देणारे हे चरित्र आहे असे हमखास म्हणता येते.

शिल्पा शिवलकर यांनी या चरित्राचे लेखन केलेले आहे. त्यांच्या मनोगतात नमूद केल्याप्रमाणे, त्यांनी खूप अभ्यास केलेला आहे. अनेक संदर्भ, त्यांचे विश्लेषण वाचताना हा अभ्यास लक्षात येतो. त्यामुळे हे लेखन लेखिकेचे नसून खुद्द जयंत देव यांनीच केले आहे, असे भासत राहते. लेखिकेचे यासाठी खरोखर कौतुक करायला हवे. एक चांगले पुस्तक वाचकांच्या हाती दिले यासाठी ग्रंथालीचेही कौतुक!

जयंत देव यांची प्रसन्न आणि तितकीच दिलखुलास मुद्रा मुखपृष्ठावर आहे. ही सतीश भावसारांची कल्पकता सुंदरच!

**मूल्य ३०० रुपये  सवलतीत १८० रुपये**

# पुस्तकप्रकाशनाची क्षणचित्रे

'बाऊन्सर' (मराठी व इंग्रजी)
आदित्य मांद्रेकर
रवि मांद्रेकरांची मुलाखत
घेताना क्वासार
राजीव श्रीखंडे
किशन नरसी
नलिन पटेल
अरुण जोशी
सुदेश हिंगलासपूरकर
मा. न्यायमूर्ती जे.एन. पटेल
आगा हुसेन
लेखक रवि मांद्रेकर
के. जयंतीलाल आणि
सुरेश शास्त्री





'पुस्तकांच्या चित्रवाटा' – लेखक शिरीष घाटे, भगवान चव्हाण, गिरीश कुलकर्णी, कुलगुरू मृणालिनी फडणवीस, सुहासिनी शहा

'आदिवासी क्रांतिकन्या' – डॉ. सखाराम डाखोरे, सुबोध मोरे, उल्का महाजन, प्रतिमा जोशी, माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके, लेखक शंकर बळी आणि धनश्री धारप





'स्वयंभू' कवितासंग्रह – रंगनाथ पाठारे, मकरंद भारंबे, आशुतोष पोतदार आणि प्रवीण शिंदे



'रिक्त–अरिक्त' – प्रा. प्रकाश नाईक, लेखिका छाया कोरेगावकर, डॉ. प्रज्ञा दया पवार, राजन खान, श्यामल गरुड आणि सुदेश हिंगलासपूरकर



'विवाहसंस्था' आणि 'हुंकारनाद' – कीर्ती पाटस्कर, महेश खरे, मकरंद जोशी, अशोक बागवे, किरण येले, लेखिका अनुराधा नेरूरकर आणि अरुण नेरूरकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.